cmyk

## संपादकीय

### आकडेवारीची जंत्री आणि कामाची फडफड !

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी सादर केलेल्या २०२४-२५ वर्षासाठीच्या पूर्ण अर्थसंकल्पाचे विश्लेषण होणे अत्यंत साहजिकच आहे. या दृष्टीने पाहू जाता भाजपला केवळ वास्तवाचेच भान आले आहे असे नाही तर त्याची गंभीर दखल घेणे व त्यावर फोकस करणेही गरजेचे वाटते आहे, हेच या अर्थसंकल्पातून स्पष्ट होते. भाजपला लोकसभा निवडणुकीत बेरोजगार तरुण, समस्याग्रस्त शेतकरी आणि मध्यमवर्गाची नाराजी याचा मोठा फटका बसला आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### संदिपान भुमरेंचा पालकमंत्रिपदाचा राजीनामा

छत्रपती संभाजीनगर : शिवसेना शिंदे गटाचे नेते संदिपान भुमरे यांनी छत्रपती संभाजीनगरच्या पालकमंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. संदिपान भुमरे यांची खासदारपदी निवड झाल्यानंतर त्यांनी पालकमंत्रिपदाचा राजीनामा दिला असून अब्दुल सत्तार आता नवे पालकमंत्री असणार आहेत. शिवसेनेचे नेते संदिपान भूमरे हे छत्रपती संभाजीनगरमधून लोकसभा निवडणूक जिंकले होते. त्यानंतर त्यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला होता. आता छत्रपती संभाजीनगरच्या पालकमंत्री पदाचाही राजीनामा त्यांनी दिला. संदिपान भूमरे यांनी लोकसभेच्या निवडणुकीत इम्तियाज जलील आणि ठाकरे गटाच्या चंद्रकांत खैरे यांचा पराभव केला होता.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-९४ | गुरूवार दि.२५ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# खरंच शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार का?

## विशेष अधिवेशन बोलावण्याच्या राज्य सरकारकडून हालचाली

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या दोन महिन्यापासून राज्य सरकार शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेणार असल्याच्या चर्चा आहेत. शिंदे सरकार शेतकरी कर्जमाफी जाहीर करेल, असे वाटत होते मात्र तसे अद्याप तरी झाले नाही. त्यातच विशेष अधिवेशन बोलवण्याच्या राज्य सरकारकडून हालचाली होत असल्याचे समजते. शेतकरी कर्जमाफी, मराठा आरक्षण आणि विधानसभा सभापती निवड या तिन मुद्दयांवर हे अधिवेश बोलावले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या आठवडाभरात शेतकऱ्यांना राज्य सरकार दिलासादायक निर्णय घेईल, असे दिसते.**



गेल्या दोन वर्षापासून निसर्गाच्या अवकृपेने शेतकरी मेटाकुटीला आला आहे. अनेकांनी आत्महत्या केल्या असून सर्वसामान्यांमध्ये त्यामुळे सरकारच्या विरोधात रोष आहे. शेतीमध्ये झालेला खर्चही सध्या निघत नाही. गेल्या वर्षी तर शेतकऱ्यांसमोर मोठ्या अडचणी होत्या. जनावरांना चारा नव्हता, तर पिण्यासाठी पाणी सुध्दा नव्हते. त्यातच लोकसभा निवडणुकीमुळे प्रशासन आणि शासन सुध्दा शेतकऱ्यांकडे पाहण्यासाठी तयार नव्हते. त्यातच निवडणुका असल्याचे आपल्याला कर्जमाफी मिळेल, या आशेवर शेतकरी गेल्या ६ महिन्यापासून आहे. लोकसभा निवडणुकीआधी तसा निर्णय होईल असे वाटले होते. मात्र केंद्र सरकारने शेतकऱ्यांना काहीच दिले नाही. केंद्र सरकारने नुकताच अर्थसंकल्प जाहीर केला. त्यातही शेतकऱ्यांच्या तोंडाला ◀◀ पान २ वर

### आता नाही तर कधीच नाही..!

लोकसभा निवडणुकीपुर्वी शेतकरी कर्जमाफी होईल असे वाटले होते, मात्र केंद्र सरकारने दिली नाही. आता राज्यात विधानसभा निवडणुक आहे. त्यामुळे निवडणुकीआधी शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली तर मिळाली नाही तर पुन्हा पुढचे पाच वर्ष शेतकरी कर्जात राहणार आहे, हे वास्तव नाकारुन चालणार नसल्याचे सर्वसामान्य जनतेतून म्हटले जात आहे.



### रविकांत तुपकरांकडून नव्या संघटनेची घोषणा

**पुणे । प्रतिनिधी**

रविकांत तुपकर यांची स्वाभिमानी शेतकरी संघटनेत निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. यानंतर रविकांत तुपकर यांनी नव्या संघटनेची घोषणा केली आहे. रविकांत तुपकर यांनी पुण्यात कार्यकर्त्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीनंतर रविकांत तुपकर यांनी आपला पक्ष हा येत्या निवडणुकीत २५ जागांवर निवडणूक ◀◀ पान २ वर

# उपोषण स्थगित करताच मनोज जरांगेंचे आता नवे मिशन

## विधानसभा निवडणुकीत एवढे आमदार निवडूण आणण्याचा निर्धार



**जालना । प्रतिनिधी**

**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटलांनी उपोषण स्थगित करून पुढच्या राजकीय लढाईची घोषणा केली आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावरून आधीच अडचणीत असलेल्या सरकारची आता जरांगे पाटलांच्या नव्या मिशनमुळे आणखी डोकेदुखी वाढणार आहे. उपोषण स्थगित करताच जरांगे पाटील यांनी ४० आमदार निवडूण आणण्याचा निर्धार केला आहे.**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटलांनी आपले ५ दिवसांचे उपोषण स्थगित करून राजकीय आखाड्यात उतरण्याची घोषणा केलीय. अंतरवालीतून जरांगे पाटलांनी विधानसभेचे रणशिंग फुंकले आहे. सरकारचा जीव ज्या खुर्चीत आहे ती खुर्ची मिळवण्याच्या तयारीत आम्ही लागू असा इशारा जरांगेंनी दिला आहे. विधानसभेत ३० ते ४० आमदार पाठवण्याचा निर्धारही त्यांनी बोलून दाखवला. जरांगे पाटलांनी विधानसभा रिंगणात उतरण्याची घोषणा केल्यानंतर राजकीय पक्षांचे टेंशन वाढले असणार हे नक्की आहे. कारण लोकसभेत सत्ताधारी भाजपला मराठा ◀◀ पान २ वर



### भाजपकडून जोरदार पलटवार

भाजपनेही जरांगेंवर जोरदार पलटवार केला. प्रविण दरेकर म्हणाले, मनोज जरांगे यांनी हिंमत असेल तर निवडणुक लढवावी, असे आव्हान देण्यात आले.

### पुन्हा फडणवीस टार्गेट

मिशन विधानसभेची घोषणा करताना जरांगे पाटलांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर पुन्हा एकदा तिखट शब्दात निशाणा साधला. फडणवीस मला जेलमध्ये टाकणार आहेत. तिथे मला गोळ्या घातल्या जातील, मला जेलमध्ये टाकल्यावर भाजपचा एकही आमदार निवडूण येऊ देऊ नका, असे आवाहन मराठा समाजाला जरांगे यांनी केले. तसेच फडणवीस राजकारणातून संपले पाहिजेत, असेही ते म्हणाले.

# माझ्या नादी लागला तर मी सोडत नाही

## देवेंद्र फडणवीसांचा अनिल देशमुखांना थेट इशारा; वेळ आल्यावर ती ऑडिओ क्लिप व्हायरल करेन



**मुंबई । प्रतिनिधी**

मी कुणाच्या नादी लागत नाही आणि माझ्या नादी लागाल तर सोडत नाही असा थेट इशारा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी राष्ट्रवादीचे नेते अनिल देशमुखांना दिला. अनिल देशमुखांच्या पक्षाच्या नेत्यांनीच त्यांच्याविरोधातील पुरावे आपल्याकडे दिल्याचा गौप्यस्फोटही त्यांनी केला. उद्धव ठाकरे आणि अजित पवारांसह काही नेत्यांवर खोटे आरोप करावेत यासाठी देवेंद्र फडणवीसांनी दबाव आणला होता ◀◀ पान २ वर

### श्याम मानव यांच्या दाव्याने खळबळ


सामाजिक कार्यकर्ते आणि अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव यांनी केलेल्या आरोपांमुळे सध्या राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठा गदारोळ निर्माण झाल्याचे पहायला मिळत आहे. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याबाबत श्याम मानव यांनी खळबळजनक खुलासा केला. अनिल देशमुखांवर इतका दबाव होता, कुटुंबाचा प्रश्न होता, त्यांच्या राजकीय भवितव्याचा प्रश्न होता. त्यांनी कुठल्याही प्रतिज्ञापत्रावर सही केली नाही. तरी देखील त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. अनिल देसाई आत्महत्या करण्याच्या विचारात होते, असा खळबळजनक दावा मानव यांनी केला. त्यावेळी त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर देखील गंभीर आरोप केला आहे.

# जो बायडेन जिवंत असल्याचे पुरावे द्या!

## अमेरिकेत नेमकं काय चाललंय? धक्कादायक मागणीने खळबळ

**न्युयार्क । वृतसंस्था**

डेली मेलच्या वृत्तानुसार, केवळ रिपब्लिकनच नाही तर डेमोक्रॅट पक्षाशी संबंधित लोकांनाही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन गंभीर आजारी असल्याची भीती वाटत आहे. सोशल मीडियावर दावा केला जात आहे की, बिडेन यांची प्रकृती झपाट्याने खालावली आहे, त्यामुळे त्यांना लोकांसमोर आणले जात नाही. जो बायडेन जिवंत असल्याचे पुरावे द्या, अशी मागणीच एका विरोधी पक्षनेत्याने केली आहे. त्यामुळे या धक्कादायक मागणीने अमेरिकेत खळबळ माजली आहे.



रिपब्लिकन पक्षाशी संबंधित काही युझर्स असा दावा करत आहेत की बायडेन यांना ओलीस ठेवण्यात आले आहे. एवढेच नाही तर एका विरोधी पक्षनेत्याने बायडेन यांच्या जिवंत असल्याचा पुरावाही मागितला आहे. तथापि, दरम्यान, व्हाईट हाऊसने म्हटले आहे की बायडेन यांची कोविड-संबंधित लक्षणे दिसत नाहीत. २५ जुलै रोजी ते देशाला संबोधित करणार आहेत. ३७ वर्षीय रिपब्लिकन नेते लॉरेन बोएबर्ट यांनी सोमवारी एक पोस्ट टाकून ◀◀ पान २ वर

# नाराजी नाट्यानंतर अजितदादा-अमित शहा, फडणवीसांची भेट

## भेटीत नेमकं दडलयं काय?, राजकीय गोटात तर्कवितर्क सुरु

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत तीनही पक्षांच्या काही मंत्र्यांमध्ये खडाजंगी झाल्याची माहिती मिळत आहे. अजित पवार यांनी निधी देण्यास नकार दिल्यामुळे महायुतीत नाराजी नाट्य रंगल्याची चर्चा आहे. त्यानंतर पडद्याआड बऱ्याच घडामोडी घडत आहेत. अजितदादा हे दिल्ली येथे अमित शहा यांना भेटले तर त्यानंतर देवेंद्र फडणवीस हे सुध्दा अजितदादांच्या भेटीला गेले. त्यामुळे नाराजीनाट्य चांगलेच रंगले असल्याचे दिसते. ही भेट नेमकी कशासाठी होती हे अद्याप समजले नसून सध्या राजकीय गोटात तर्कवितर्क सुरु आहेत.**



मंत्रिमंडळ बैठकीत जोरदार खडाजंगी झाल्याची माहिती मिळत आहे. राज्य मंत्रिमंडळाची नुकतीच मंगळवारी बैठक पार पडली. या बैठकीत महायुतीच्या नेत्यामध्ये खडाजंगी झाल्याची माहिती मिळत आहे. अजित पवार ◀◀ पान २ वर

### देवेंद्र फडणवीस अजित पवार यांच्या भेटीला

विशेष म्हणजे यानंतरही घडामोडी थांबल्या नाहीत. अजित पवार दिल्लीतून जावून आल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे त्यांच्या भेटीसाठी गेले होते. दोघांमध्ये २ तास चर्चा झाल्याचे समजते. त्यामुळे आता या प्रकरणात काय-काय घडामोडी घडतात? ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२४ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ०.५० क्विंटल | २,२५० | २,२५० | २,२५० |
| ज्वारी/हायब्रिड :२३.५० क्विंटल | २,१३१ | २,३९१ | २,२५५ |
| मूग : १.०० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : १.०० क्विंटल | ९,५०० | ९,५०० | ९,५०० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| बाजरी: ११.५० क्विंटल | २,५०० | २,७७० | २,६५० |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १७.५० क्विंटल | ४,१०० | ४,४७० | ४,२८५ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,४०० | ६,३०१ | ५,८५० |

# बीड जिल्ह्यातील खरीप २०२३ चा उर्वरित पीकविमा तातडीने वितरित करा-धनंजय मुंडे

## » मंत्रालयात बीड जिल्ह्यातील पीकविमा संदर्भात बैठक

**मुंबई । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात खरीप २०२३ मध्ये अग्रीम २५% प्रमाणे वितरित झालेल्या पिकविम्या नंतर उर्वरित नैसर्गिक आपत्ती नुकसान व अंतिम पीक कापणी प्रयोगानंतर सरासरी उत्पन्नात झालेली घट यातील फरक रक्कम यासंदर्भात कंपनीने तयार केलेले अहवाल पुनर्तपासनी करावेत व तातडीने शेतकऱ्यांचा उर्वरित विमा अदा करावा, असे निर्देश आज कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी संबंधित विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.**

बीड जिल्ह्यासह बुलढाणा, यवतमाळ यांसह विविध जिल्ह्यातील प्रलंबित पीक विमा याबाबत आज कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. काही ठिकाणी पीक नुकसानी बाबतची माहिती विमा कंपनीस उशिरा मिळाल्या असल्याचे कंपनीच्या वतीने सांगण्यात आले. यावेळी संबंधित नुकसानीच्या अहवालांची बारकाईने पुनर्तपासनी केली जावी. अंतिम पीक कापणी प्रयोगानंतर द्यावयाच्या अंतिम रक्कमा निश्चित करताना सरासरी उत्पन्न व अन्य निकषांचा योग्य पद्धतीने विचार व्हावा, अशा सूचना देखील धनंजय मुंडे यांनी दिल्या. या बैठकीस कृषी विभागाच्या प्रधानसचिव व्ही.राधा, कृषीआयुक्त विजयकुमार आवटे तसेच कृषी विभागातील अधिकारी आणि पिक विमा कंपनीचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते. खरीप २०२३ मध्ये बीड जिल्ह्यातील १८ लाख ५१ हजार अर्जाद्वारे शेतकऱ्यांनी पीकविमा योजनेत सहभाग घेतला होता. आतापर्यंत ३९१ कोटी ९७ लाख रुपये



इतका विमा मंजूर करण्यात आला असून, यापैकी ३२८ कोटी रुपयांचे वितरण पूर्ण झाले असून, आणखी ६७ कोटी १२ लाख रुपयांचे वितरण सुरू आहे. स्थानिक नैसर्गिक आपत्ती व अंतिम अहवाल यानुसार या रक्कमेत आणखी वाढ होणार आहे.

cmyk

## अग्रलेख

# आकडेवारीची जंत्री आणि कामाची फडफड !

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी सादर केलेल्या २०२४-२५ वर्षासाठीच्या पूर्ण अर्थसंकल्पाचे विश्लेषण होणे अत्यंत साहजिकच आहे. या दृष्टीने पाहू जाता भाजपला केवळ वास्तवाचेच भान आले आहे असे नाही तर त्याची गंभीर दखल घेणे व त्यावर फोकस करणेही गरजेचे वाटते आहे, हेच या अर्थसंकल्पातून स्पष्ट होते. भाजपला लोकसभा निवडणुकीत बेरोजगार तरुण, समस्याग्रस्त शेतकरी आणि मध्यमवर्गाची नाराजी याचा मोठा फटका बसला आहे. ही नाराजी दूर करून 'डॅमेज कंट्रोल'ची धडपड करतानाच विरोधकांच्या भात्यातील बेरोजगारीचे प्रभावी टीकास्त्र निष्प्रभ करण्याची खटपट मोदी सरकारने आपल्या या अर्थसंकल्पातून केली आहे. मोदी सरकारने रोजगारासंदर्भात मागच्या दहा वर्षांत कितीही मोठ्या घोषणा केल्या असल्या व त्याच्या जंजाळ आकडेवारीची जंत्री सादर केली असली तरी देशातील बेरोजगारीची समस्या प्रचंड वाढली आहे.

हेच जमिनी वास्तव आहे. विरोधकांनी विशेषत: काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सातत्याने हा मुद्दा उचलून मोदी सरकारला लक्ष्य केले होते. त्याची योग्य दखल घेऊन उपाययोजना करण्याऐवजी धार्मिक ध्रुवीकरणाचे मुद्दे रेटून या मुद्याला बगल देण्याचा प्रयत्न भाजपने सातत्याने केला. मात्र, लोकसभा निवडणुकीत बेरोजगार तरुणांच्या नाराजीचा फटका बसल्यावर भाजपला अखेर जमिनी वास्तव मान्य करण्याचे राजकीय शहाणपण आलेले दिसते. तसेही अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी आलेल्या आर्थिक पाहणी अहवालानेही सरकारला जमिनी वास्तवाची परखडपणे जाणीव करून देण्याचा स्तुत्य प्रयत्न केला होताच. केंद्र सरकारचे प्रमुख आर्थिक सल्लागार वेंकटरामन अनंत नागेश्वरन यांनी १९९१ मध्ये झालेल्या उदारीकरणानंतर अनेक क्षेत्रांमध्ये आता नव्याने पुनर्रचनेची, नव्या मांडणीची वेळ आली आहे, हे वारंवार स्पष्ट केले आहे. कृषी क्षेत्र, हवामान बदलाचे आव्हान, उद्योग क्षेत्राला अधिक स्वातंत्र्य, देशातील कोट्यवधी तरुणांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण आणि त्यांच्यासाठी रोजगारांची निर्मिती अशा विविध आघाड्यांवर मूलभूत व क्रांतिकारी बदल सरकारला करावे लागणार आहेत, हेच नागेश्वरन यांनी आर्थिक पाहणी अहवालातून अप्रत्यक्षपणे सुचवले होते. सीतारामन यांनी सादर केलेला अर्थसंकल्प पाहता मोदी सरकारने ही हिंमत दाखविलेलीच नाही, हे स्पष्ट होते. त्यापेक्षा प्रचार काळात विरोधकांनी उपस्थित केलेल्या अडचणींच्या मुद्यांवर जसे तात्पुरत्या मलमपट्टीने 'डॅमेज कंट्रोल'चा प्रयत्न होतो तसाच 'डॅमेज कंट्रोल'चा प्रयत्न या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. थोडक्यात लोकसभा निवडणुकीतील झटक्याने भाजपला राजकीय भान आले असले तरी 'अर्थभान' आलेले नाहीच! त्यामुळे बेरोजगारीच्या समस्येच्या मुळाला हात घालण्याऐवजी सरकारने 'डॅमेज कंट्रोल'ला प्राधान्य देत देशातील तरुणांची नाराजी तात्पुरती मलमपट्टी करून दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्याच परिणामी बजेटमध्ये २ लाख कोटी रुपयांच्या केंद्रीय खर्चासह ५ वर्षांतील सुमारे ४ कोटी तरुणांना रोजगार, कौशल्य आणि इतर संधी उपलब्ध करून देण्यासाठी पाच योजना व उपक्रमांची घोषणा करण्यात आली आहे. यावर्षी सरकारने शिक्षण, रोजगार व कौशल्य विकासासाठी १.४८ लाख कोटी रुपयांची तरतूद केल्याचे सीतारामन यांनी जाहीर केले. सरकारच्या योजनेअंतर्गत सर्व क्षेत्रांत प्रथमच कामाला आलेल्या कर्मचाऱ्यांना एक महिन्याचे दैनंदिन वेतन सरकारकडून दिले जाणार आहे. त्यांना हा पगार तीन हप्त्यांमध्ये दिला जाईल व त्याची किमान रक्कम १५ हजार रुपये असेल. तर पात्रता मर्यादा १ लाख रुपये प्रति महिना वेतनापर्यंत असेल. सरकारच्या दाव्यानुसार याचा फायदा देशातील २ कोटी १० लाख तरुणांना होणार आहे. सरकार उत्पादन क्षेत्रात नोकऱ्या वाढाव्यात यावर भर देणार आहे. त्यासाठी उद्योजकांनी अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करावेत यासाठी सरकार प्रोत्साहन देणार आहे. यामुळे उत्पादन क्षेत्रात येणाऱ्या ३० लाख तरुणांना व त्यांना नियुक्त करणाऱ्या उद्योजकांना मदत होण्याचा सरकारचा दावा आहे. १ लाख रुपयांपर्यंत पगार असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचा यात समावेश असेल. प्रत्येक अतिरिक्त कर्मचा-याच्या भविष्य निर्वाह निधीच्या योगदानासाठी केंद्र सरकार नियोक्त्यांना दरमहा ३००० रुपयांपर्यंत परतफेड करेल. ५० लाख लोकांना अतिरिक्त रोजगार देण्यासाठी ही योजना मंजूर करण्यात आल्याचा सरकारचा दावा आहे. मॉडेल स्किल लोन योजनेत कर्जाची सुविधा देण्यासाठी बदल करण्यात येणार आहे. उच्च शिक्षणासाठीच्या शैक्षणिक कर्जाची मर्यादा १० लाख रुपये करण्यात येईल. एकूण कर्ज रकमेच्या तीन टक्के रक्कम सरकार वार्षिक व्याज सवलतीसाठी देणार आहे. देशातील ५०० टॉप कंपन्यांमध्ये इंटर्नशिपची संधी सरकार येत्या पाच वर्षांत १ कोटी तरुणांना उपलब्ध करून देणार आहे. मानधन म्हणून तरुणांना प्रति महिना ५ हजार रुपये भत्ता दिला जाणार आहे. इंटर्नशिपची सुविधा देणा-या कंपन्या प्रशिक्षण खर्चाच्या १० टक्के खर्च त्यांच्या संबंधित कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिब्लिटी फंडातून करतील.

थोडक्यात सरकारने पुढील पाच वर्षांत ४.१ कोटी तरुणांना रोजगार देण्याचे आश्वासन दिले आहे. आर्थिक पाहणी अहवाल मात्र दरवर्षी सरासरी ७८.५ लाख नोकऱ्या निर्माण होणे आवश्यक असल्याचे नमूद करतो. हे वास्तव पाहता सरकारने बेरोजगारीच्या प्रश्नाला हात घातला असला तरी तो जुजबी मलमपट्टीतच मोडतो, हे स्पष्ट होते. कृषी क्षेत्रातही संरचनात्मक बदलाच्या धोरणाची अपेक्षा आर्थिक पाहणी अहवालात व्यक्त करण्यात आली होती. कृषी क्षेत्रातील संरचनात्मक बदलाशिवाय 'विकसित भारत' हे स्वप्न सर्वार्थाने खरे होणार नाही. सरकारने येथेही मूळ दुखण्यावर उपचारापेक्षा मलमपट्टीवरच भर दिला आहे. कृषी क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटी रुपयांची भरीव तरतूद सरकारने केली असली तरी त्याचा शेतक-यांचे उत्पन्न वाढण्यात किती फायदा होणार व शेतमालाच्या व्यापाऱ्यांचा किती फायदा होणार? हा प्रश्न आहे. शेतकऱ्याच्या पदरात थेट दान सरकारने टाकलेलेच नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुपटीने वाढ करण्याच्या सरकारच्या घोषणेची पूर्तता होण्याची शेतकऱ्यांना आणखी प्रतीक्षाच करावी लागणार हे स्पष्ट आहे. मध्यम वर्गाची नाराजी दूर करतानाही सरकारने अशीच मलमपट्टी केली आहे.

# मराठा आरक्षण आंदोलनाच्या माध्यमातून घटनात्मक चौकट उध्वस्त करण्याचा डाव-प्रा.हाके

**आष्टी । प्रतिनिधी**

**जरांगे पाटील यांचे मराठा आरक्षण आंदोलन हे घटनाबाह्य आणि बेकायदा असून या आंदोलनाच्या माध्यमातून घटनात्मक चौकट उध्वस्त करण्याचा डाव आहे अशी घणाघाती टीका ओबीसी आरक्षण बचाव जन आक्रोश यात्रेमध्ये प्रा.लक्ष्मण हाके यांनी केली ओबीसी आरक्षण बचाव जन आक्रोश यात्रेमध्ये आष्टी येथे पत्रकारांशी ते बोलत होते.**



आष्टी येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी दिपक भुजबळ,संदीप गावडे हे उपस्थित होते. प्रा.हाके पुढे म्हणाले,महाराष्ट्रात चारशे पेक्षा जास्त जाती ओबीसी समजामध्ये मोडतात.जरांगे यांच्याकडून ओबीसी आरक्षणात घुसखोरी केली जात आहे. राज्यातील प्रस्थापितांनी मनोज जरांगेना समोर केले आहे. संविधानात आरक्षणाचे धोरण ठरलेले असून दुय्यम वागणूक मिळालेल्या समाजाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आरक्षण लागू केले आहे.संभाजीनगर खंडपीठाच्या न्यायमूर्ती बी.एच.मर्लापल्ले यांनी सांगितले आहे की, कुणबी आणि मराठा एक म्हणणे म्हणजे सामाजिक मूर्खपणा आहे.यासाठीच ओबीसी आरक्षण बचाओ जन आक्रोश यात्रा संपूर्ण महाराष्ट्रात घेऊन जाणार असून ओबीसी समाजाची जागरूकता करण्यासाठी या यात्रेचे आयोजन केले असल्याचे सांगीतले. यावेळी तालुक्यातील ओबीसी नेते, कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा. लक्ष्मण हाके म्हणाले की,मनोज जरांगे यांच उपोषण बेकायदेशीर व घटनाबाह्य असून आंदोलनाच्या माध्यमातून घटनात्मक चौकट उध्वस्त करण्याचा डाव आहे.आरक्षण मागणारा लाजिरवाणा, शोषित असतो, बघून घेईन म्हणणारा तसेच मुख्यमंत्री व शासन व्यवस्था वेठीस धरणारा मागास असू शकतो का ? असा प्रश्न हाके यांनी उपस्थित केला. सरकार सत्यापासून दूर पळालं तर जरांगे नावाचं भूत तुमच्या मानगुटीवर बसेल.तुमचा घात करेल व तोंड काळ करण्याची वेळ तुमच्यावर येईल अशी जहरी टीका प्रा.लक्ष्मण हाके यांनी बोलताना केली.यामुळेच गावगाड्यातील ओबीसी,अठरा पगड जाती जाग्या होऊन रस्त्यावर उतरत आहेत. छोटे-छोटे समाज एकत्र झाली तर राजकारण विसरून जायची वेळ राज्यकर्त्यांवर येईल असेही हाके यांनी सांगितले.जरांगे यांच्या आंदोलनाच्या माध्यमातून पंचायत राज मधील ओबीसींच प्रतिनिधित्व संपवण्याचा प्रयत्न केला जात आहे.आंदोलनकर्ते आमदारकी,खासदारकी व मुख्यमंत्री तसेच मंत्रिमंडळातील प्रतिनिधित्व टक्केवारीवर बोलायला तयार नाहीत. यशवंतराव चव्हाण पासून आज पर्यंत हेच मेरीट सेट आहे.यामुळे ही लढाई आरक्षण गरजवंतांची नसून वर्चस्वासाठीची आहे अशी टीका प्रा.हाके यांनी केली.राज्यात मराठा समाज हा शासक,पाटील, मालक, जागीरदार, वतनदार,आमदार, खासदार व कारखानदार आहे.

# बीड-नांदूरघाट बस न आल्याने विद्यार्थ्यांसह प्रवाशाचे हाल

**चौसाळा । प्रतिनिधी**



शासनाने शालेय विध्यारत्यांना बस प्रवासात सवलत दिली ही एक चांगली बाब आहे सदर नियोजित बस ही काही वेळेला वेळेवर येत नाही तर सदर बस चौसाळा येथे आलीच नसल्याने भर पाऊसात विद्यार्थ्यांचे तसेच प्रवशाचे हाल झाल्याची घटना घडली बीड आगारातून बीड चौसाळा नांदूर या बस ने शालेय पास धारक ८० विध्यार्थी प्रवास करतात सदर नियोजित ही बस दि २४/७/२०२४. रोजी बाजार दिनी बस स्थानकात चार तास उलटूनही बस आली नसल्याने प्रवशाचे व विद्यार्थ्यांचे हाल होऊन बस स्थानकात त्यांना तात्काळत थांबावे लागले तर अनेक प्रवाशाने बस नसल्याने खाजगी वाहणाने प्रवास करून गावी परतावे लागले सदर बस बाबत बीड आगाराचे व्यवस्थापक यांना दूरध्वनी क्रमांक ०२४४२२२२३१६ या क्रमांकवर संपर्क साधला असता केवळ २ ते ३ वाजे पर्यंत केवल फोन वाजत होता तो उचला गेला नाही ही एक विशेष बाब आहे समंधित अधिकाऱ्यांनी सदर किमान शालेय विध्यार्थ्यांच्या सोईची दैनंदिनी नियोजित बस वेळेवर सोडून विध्यार्त्यांची गैर सोय टाळावी अशी मागणी पालक वर्गातुन केली जाते.

# हैदराबाद गॅझेटचा वापर करून कुणबी नोंदी तपासणी पूर्ण करा-मंत्री देसाई

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात मराठा कुणबी नोंदीबाबत केलेल्या सर्वेक्षणात नोंदी न आढळलेल्या समाज बांधवांसाठी शासनाने अधिकच्या नोंदी मिळविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार 'हैदराबाद गॅझेट'मधील नोंदी मिळविण्यासाठी अधिकाऱ्यांचे पथक हैदराबाद येथे पाठविले. या पथकाने तपासलेल्या कागदपत्रांची मागणी शासनाने विहीत शुल्क भरून केली आहे. या कागदपत्रांच्या सत्यप्रती तातडीने उपलब्ध करून कागदपत्रांची पडताळणी गतीने पूर्ण करावी, असे निर्देश राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्री उपसमितीचे सदस्य शंभूराज देसाई यांनी आज दिले. मंत्रालयातील समिती कक्षात मराठा समाज आरक्षण व संबंधित विषयांबाबत बैठकीचे आयोजन मंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले हाते. या बैठकीला गृह विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, विधी व न्याय विभागाच्या सहसचिव सुवर्णा केवल आदी उपस्थित होते. मंत्री श्री. देसाई पुढे म्हणाले की, राज्यात मागील काळात शासनाने मराठा कुणबी नोंदी पडताळणी साठी युद्धपातळीवर सर्वेक्षण पूर्ण केले. यामध्ये आढळलेल्या नोंदीनुसार मराठा कुणबी प्रमाणपत्र मराठा समाज बांधवांना देण्यात आले. मात्र, या सर्वेक्षणात नोंदी न आढळल्यामुळे प्रमाणपत्र देण्यास अडचण आली. हैदराबाद गॅझेटमधील जास्तीच्या नोंदी तपासून प्रमाणपत्र न मिळालेल्या मराठा समाज बांधवांना प्रमाणपत्र देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात यावी. हे कामही युद्धपातळीवर पूर्ण करावे. सगे- सोयरे बाबत कागदपत्रांची तपासणी करण्यात यावी. या छाननीचे कामही अंतिमस्तरापर्यंत नेण्यात यावे. न्या. शिंदे समितीला पुन्हा मुदतवाढ देण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशाही सूचना मंत्री श्री. देसाई यांनी आज दिल्या. मराठा आरक्षण मागणीच्या आंदोलनादरम्यान दाखल झालेले विविध गुन्हे मागे घेण्याबाबतची कार्यवाही करावी. यामध्ये ३१ जानेवारी २०२४ पूर्वी दाखल गुन्ह्यावर दोषारोपपत्र झालेल्या प्रकरणांमध्ये गुन्हे मागे घेण्याची कार्यवाही गतीने पूर्ण करावी. तसेच ३१ जानेवारी २०२४ नंतर दाखल असलेल्या गुन्ह्यांबाबत नवीन शासन निर्णय काढण्याची कारवाई करावी, असे निर्देशही मंत्री श्री. देसाई यांनी दिले.

# जालन्याचे जलसम्राट आ.गोरंट्याल यांना काँग्रेस पक्षाने पुन्हा एकदा उमेदवारी द्यावी

**जालना । प्रतिनिधी**

जालना विधानसभा मतदारसंघासाठी जल सम्राट आ.कैलास गोरंट्याल यांनाच पुन्हा एकदा २०२४ विधान सभेची उमेदवारी काँग्रेस पक्षाने जाहिर करावी अशी मागणी जालना जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाने केलीय. जालना जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष अब्दुल रफिक अब्दुल रशीद यांनी या मागणीचे पत्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना पाठवलय. कैलास गोरंट्याल समाजातील सर्व जातीय व सर्व धर्मीय लोकांना सोबत घेऊन चालणारे असून ते जिल्ह्यात धर्मनिरपेक्ष नेता म्हणुन परिचित आहे. जालना जिल्ह्यातील जनतेचे मागील ३० वर्षापासून लोकप्रतिनिधी म्हणुन व विविध माध्यमातुन गोरंट्याल जनतेची सेवा करून त्यांच्या अडीअडचणी दुर करतात. तसेच लोकांच्या सुखादुःखात सदैव सहभागी होऊन आमदार गोरंट्याल यांनी जालना जिल्ह्यातील दलित, मुस्लिम, आदिवासी, ओ.बी.सी. व मराठा सह सर्वच जाती धर्माला नेहमीच न्याय दिलाय. गोरंट्याल यांनी काँग्रेस पक्ष जिल्ह्यात जिवंत ठेऊन सर्व सामान्य काँग्रेस कार्यकर्त्यांना नेहमीच आधार दिलाय. याचबरोबर जालना जिल्ह्यात काँग्रेस पक्षाची पाळमुळं आमदार गोरंट्याल यांनी घट्ट रूजविली आहेत. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी जालना विधानसभेचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून कैलास गोरंट्याल यांना संधी देण्यात यावी अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे करण्यात आलीय.

जालना शहराचा अत्यंत जिव्हाळयाचा असा पाणी प्रश्न आमदार कैलास गोरंट्याल यांनी मार्गी लाऊन शहरवासीयांना कायम स्वरूपी पिण्याचे पाणी उपलब्ध करून देऊन संपूर्ण शहराचा पाणी प्रश्न मार्गी लावला आहे. त्यांच्या याच कार्यामुळे त्यांना जनतेने जालना चे जलसम्राट आमदार म्हणुन उपाधी दिली आहे. जालना शहर व ग्रामीण भागात काना कोपऱ्यात गावअंतर्गत रस्त बांधकाम सभागृह ग्रामीण रस्ते, शादिखाने, स्वच्छता गृह, आरोग्य व शैक्षणिक कार्यात मोठे योगदान देऊन त्यांनी मतदार संघाचा मोठा विकास केला आहे. आमदार कैलास गोरंट्याल यांच्या पत्नी जालना नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा संगिताताई गोरंट्याल यादेखील जालना नगर पालिकेत देशात विक्रमी मतांनी नगराध्यक्ष म्हणुन निवडुन आलेल्या आहेत. आणि जालना शहर स्वच्छतेच्या बाबतीत त्यांनीच आग्रभागी आनले आहे. दररोज प्रत्येक वार्डात आणि गल्ली व शहराच्या काना कोपऱ्यात घंटा गाडी पाठवून स्वच्छतेला प्राधान्य दिल्याने संपूर्ण जालनेकर त्यांचे हे कार्य कदापि विसरणार नाही. आमदार कैलास गोरंट्याल हे सर्व धर्माच्या लोकांना न्याय मिळवून देऊन कायम त्यांना सोबत घेऊन चालणारा नेता अशी इमेज त्यांची झाली आहे. तसेच १९९९ साली आमदार कैलासजी गोरंट्याल यांनी पहिल्यांदा विधान सभा जिंकून आमदार झाले, त्यानंतर २००९ साली मध्ये दुसऱ्यांदा पुन्हा आमदार झाले. तसेच सन २०१४ च्या निवडणुकीत त्यांना अपक्ष उमेदवारामुळे अवघ्या २८० मतांच्या फरकाने त्यांना पराभव पत्कारावा लागला. त्यानंतर पुन्हा नव्याने जोमाने जनतेत जाऊन त्यांनी सन २०१७ ला जालना नगर पालिका विक्रमी मतांनी काँग्रेस पक्षाकडे खेचून आनली. आणि २०१९ विधान सभा निवडणुकीत पुन्हा तिसऱ्यांदा मोठ्या मताधिक्याने विजय खेचून आनला. जालना मतदार संघात प्रचंड विकास कामे केली, आमदार फंडातून धार्मीक संस्थाना मदत करण्यात आली. जालना येथे वैद्यकिय महाविद्यालय आणन्यास पाठपुरावा करून जालना येथे वैद्यकिय महाविद्यालय आनले. तसेच जालना च्या औद्योगीक क्षेत्रातील त्यांचे योगदानही मोठे आहे. कृषि शिक्षण क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य विसरता येणार नाही. अशा पध्दतीने सर्व सामान्य जालेनकरांना सर्व जाती धर्माच्या लोकांना कायम सोबत ठेऊन काँग्रेस पक्ष जालना जिल्हयात जिवंत ठेऊन कार्यकर्त्यामध्ये प्रचंड उत्साह निर्माण करणारा हा सर्वसामान्य लोकनेत्याला जालना विधान सभा मतदार संघाची पुन्हा उमेदवारी देऊन जनतेची सेवा करण्याची संधी दयावी अस जालन्याच्या जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अल्पसंख्यांक विभागाच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटलय.

# चारचाकी वाहण चोरी करणारे तिघांना अटक

**अंबड । प्रतिनिधी**

२३ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान सुखापूरी ता. अंबड येथील नसीर जमीर बागवान यांच्या मालकीची चारचाकी टाटा कंपनिची व्हीस्टा कार क्रमांक २१३६०२ ही त्यांनी त्यांच्या घरासमोर लावली होती. सदरची कार त्यांनी रात्री ०८:०० वाजता जाउन पाहीली असता त्यांना ती दिसून आली नाही. त्यामुळे त्यांनी गोंदी पोलीसांना संपर्क केला. गोंदी पोलीसांनी तत्परता दाखवत सदर वाहणाचा हद्दीत शोध घेतला असता त्यांना सदरची गाडी ही करंजळा गावाच्या जवळ जायकवाडी कालव्या जवळ मिळून आली. पोलीसांनी त्यांचा पाठलाग करून सदर गुन्हयातील मुद्देमाल गाडी व गाडी चोरणारे अमोल बन्सी पवार वय २८ वर्षे रा. घुंगडे हदगाव ता. अंबड , अमोल अशोक मेंढकर वय २८ वर्ष रा. घुर्गडे हदगाव ता. अंबड, प्रदिप ऊर्फ बाळू भाउसाहेब चिरके वय २६ वर्षे रा. सामानगाव ता. जालना यांना ताब्यात घेउन अटक करण्यात आली आहे. त्यांच्या विरुध्द भारतीय न्याय संहीतेचे कलम ३०३(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या तिघा आरोपींना आज न्यायालयामध्ये हजर केले असता तिघांना १४ दिवसांचा एम सी आर देण्यात आला अशी माहिती गोंदी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांनी दिले आहेत सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधिक्षक, श्री अजयकुमार बंसल , मा. अपर पोलीस अधिक्षक, आयूष नोपाणी , मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड, श्री विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक, आशिष खांडेकर, पोलीस उपनिरीक्षक आय.एम. शेख, पोलीस हेड कॉन्स्टेबल गणेश मुंढे, पोलीस नाईक योगेश दाभाडे पोलीस कॉन्स्टेबल अंकूश पोटे, पोलीस ठाणे गोंदी यांनी केली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक बालासाहेब खवल हे करीत आहेत.

## पान १वरून...

### खरंच शेतकऱ्यांना

पाने पुसण्याचे काम केले गेले आहे. आता विधानसभा तोंडावर आली असून राज्य सरकार तरी शेतकऱ्यांना कर्जमाफी देईल का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मराठा आरक्षण, शेतकरी कर्जमाफी आणि विधानसभा सभापती निवड या तीन मुद्दयावर राज्य सरकार कोणत्याही क्षणी विशेष अधिवेशन बोलावू शकते, असे म्हटले जात आहे.

----------

### उपोषण स्थगित करताच मनोज

आंदोलनाचा फटका बसल्याचे दिसून आले आहे. जरांगे पाटलांच्या नविन मिशनमुळे आता महायुतीची डोकेदुखी वाढणार असल्याचे बोलले जात आहे.

----------

### रविकांत तुपकरांकडून

लढवणार, अशी घोषणा केली. महाराष्ट्र क्रांतिकारी आघाडी असे त्यांच्या संघटनेचे नाव आहे. तसेच राज्यव्यापी आंदोलनाची घोषणाही त्यांनी यावेळी केली आहे. आमची संघटना राज्यातील तिसरी आघाडी म्हणून विधानसभा निवडणुक लढवणार असल्याचे ते म्हणाले.

-----------

### नाराजी नाट्यानंतर अजितदादा-

हे राज्याचे अर्थमंत्री आहेत. त्यामुळे त्यांच्या परवानगीनेच सर्व खात्यांना निधी दिला जात आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निधी देण्यावरुनच वादाची ठिणगी पडली, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. त्यानंतर अजित पवार हे थेट दिल्लीला गेले. अजित पवार यांनी दिल्लीत जावून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. दोघांमध्ये ४५ मिनिटे चर्चा झाली. या भेटीत आगामी विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाबाबत चर्चा झाल्याची शक्यता आहे. दुसरीकडे या बैठकीत मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या नाराजी नाट्याबद्दलची चर्चा झाल्याची शक्यता आहे. मंत्री गिरीश महाजन, मंत्री गुलाबराव पाटील, मंत्री विजयकुमार गावित या मंत्र्यांनी अजित पवारांकडे अधिकच्या निधीची मागणी केली होती. पण अजित पवारांनी अधिकचा निधी देण्यास नकार दिला. त्यामुळे काही काळ बैठकीतले वातावरण तापलेले होते. कारण अजित पवार आणि या तीनही मंत्र्यांमध्ये खडाजंगी झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. या बैठकीत अजित पवार यांच्याकडून नाराजी व्यक्त करण्यात आली.

-----------------

### जो बायडेन जिवंत

खळबळ उडवून दिली. त्यांनी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जिवंत असल्याचा पुरावा मागितला. बोएबर्ट यांनी लिहिले की बायडेन यांनी कॅमेऱ्यासमोर येऊन त्यांच्या रिकव्हरीबद्दल बोलावे. मला वाटते की आता ते निवडणूक लढवणार नाहीत हे बायडेन यांनाही माहीत नसेल. अँटी-बायडेन डाव्या विचारसरणीचे पत्रकार ग्लेन ग्रीनवाल्ड यांनी सोशल मीडियावर पोस्ट केले की अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी निवडणूक लढवू नये असे सोशल मीडियाद्वारे सांगितले हे अगदी विचित्र आहे. त्यांनी स्वतः टेलिव्हिजनवर यायला हवे होते किंवा प्रत्यक्ष समोर येऊन आपले मत मांडायला हवे होते, असे ते म्हणाले.

-------------------

### माझ्या नादी लागला

असा आरोप माजी गृहमंत्री अनिल देशमुखांनी केला होता. त्यावर फडणवीसांनी प्रत्युत्तर दिले आहे. तसेच वेळ आली तर मी ती ऑडिओ क्लिप सार्वजनिक करेन, असेही ते म्हणाले. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अनिल देशमुखांनी या आधीही आपल्यावर आरोप केले होते. मी आधी यावर बोललो नव्हतो. मी अशा प्रकारचं राजकारण कधीही करत नाही. मी कुणाच्या नादी लागत नाही आणि कुणी नादी लागलं तर सोडत नाही. मला देशमुखांना एकच सांगायचं आहे, त्यांच्याच पक्षाच्या काही नेत्यांनी माझ्याकडे काही ऑडिओ व्हिज्युअल्स दिलेत. त्यामध्ये अनिल देशमुख शरद पवार, उद्धव ठाकरे, सचिन वाझे यांच्याबद्दल काय म्हणत आहेत हे दिसतंय. रोज कुणी माझ्यावर आरोप करत असेल तर मी शांत बसणार नाही. वेळ आली तर त्या गोष्टी मला पब्लिक कराव्या लागतील. देवेंद्र फडणवीस पुराव्याशिवाय काही बोलत नाही. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आता सीबीआयने जी चार्जशीट दाखल केली आहे त्यामध्ये गिरीश महाजनांवर मोक्का लावण्यासाठी दबाव टाकण्यात येत होता असा आरोप करण्यात आला आहे. महाजनांवर खोटे गुन्हे दाखल करायला लावले याचे ऑडिओ व्हिज्युएल पुरावे आपण दिले होते. ते पुरावे सीबीआयने कोर्टात दाखल केले. महाविकास आघाडी सरकारने विरोधी आमदारांवर कशा प्रकारे मोक्का लावण्याचा प्रयत्न केला हे यावरून दिसत आहे.

**शाम मानव सुपारीबाजांच्या नादी लागले का?**

अनिसचे प्रमुख शाम मानव यांनी केलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शाम मानव मला इतके वर्षे ओळखतात, आरोप करण्यापूर्वी मला एकदा विचारायला हवे होते. अलिकडच्या काळात अनेक सुपारीबाज तयार झाले आहेत. सुपारी घेऊन आरोप करणे हे त्यांचे काम आहे. त्या सुपारीबाजांच्या नादाला शाम मानव लागले का हे पाहावं लागेल.

## टि.सी.हरवला आहे.

दिव्या गोरक्ष थोरात वर्ग बारावी विज्ञान सायन्स संत रामदास महाविद्यालय घनसावंगी बारावी पासची टी.सी.घनसावंगी ते म. चिंचोली प्रवासादरम्यान हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधवा.

:::: संपर्क ::::
मो.७८७५९३१७६५

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. २५ जुलै २०२४


## मोटारसायकल चोर समजून बेदम मारहाण

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरात मोटार सायकल चोरीच्या घटनेत मोठी वाढ झाल्याने नागरिक चांगलेच धास्तावले असून यातच तीन इसमाला मोटार सायकल चोर असल्याच्या संशयावरून बेदम मारहाण झाल्याची घटना शहरात घडली. याप्रकरणी मारहाण झालेल्या इसमाचा फिर्यादीवरून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परळी शहरात मोटार सायकल चोरी होण्याच्या घटनेत प्रचंड वाढ झाली आहे.घरासमोर उभी केलेली मोटारसायकल चोरीला जात असल्याने नागरिक चांगलेच धास्तावले आहेत.यातच शहरातील नाथ चित्र मंदिर मागील शिवाजी नगर भागात मंगळवार दि २३ रोजी तीन अज्ञात इसम हे मोटारसायकल चोर असल्याच्या संशयावरून तिघाजणांनी शिवीगाळ करत काठीने हातापायावर व डोक्यावर मारहाण केली.या प्रकरणी पीडित शेख शादुल शखे नजीर ( वय ४०,व्यवसाय मजुरी ) यांच्या फिर्यादीवरून परळी शहर पोलीस ठाण्यात गुरंन ११४ / २०२४ कलम ११८(१), ३५२,३(५) बी.एन.एस कायद्यानव्ये तीन अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी अधिक तपास ठाण्याचे कर्मचारी भताने हे करत आहेत.

# परिस्थितीवर मात करुन यशाच्या शिखरापर्यंत पोहचा-प्रा.नागवे

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्याचं काम करत आहेत-प्रा.नितीन बानगुडे पाटील

**वडवणी प्रतिनिधी**

परिस्थितीवर मात करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी यशाच्या शिखरापर्यंत पोहोचवण्याचे काम करावे प्रतिपादन प्रा. डी के नागवे यांनी केले. तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्याचे काम प्रा. डी के नागवे सर करत असल्याचे गरोद्गार प्राध्यापक नितीन बानगुडे पाटील यांनी काढले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी ते बोलत होते.

वडवणी सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये उच्चतम गुणवत्ता निर्माण करणारी वडवणी शहरातील नामांकित प्रा.डी.के.नागवे सरांची मॅथ्स ॲण्ड सायन्स अकॅडमी मधील एनएमएमएस शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेले व इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेले विद्यार्थी तसेच बाजीराव चव्हाण साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेत प्रथम, व्दितीय,तृतीय,चतुर्थ,पंचम क्रमांक आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यासाठी गौरव गुणवंतांचा सोहळा आनंदाचा या कार्यक्रमासाठी प्रा.नितीनजी बानगुडे पाटील यांचे प्रेरणादायी करिअर मार्गदर्शन व जीवनात क्रांती घडवून आणणारे हृदयस्पर्शी व्याख्यान अकॅडमीचे संचालक प्रा.डी.के.नागवे सरांनी दि.२२ जुलै २०२४ वार सोमवार रोजी त्रिमूर्ती मंगल कार्यालयामध्ये आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला विद्यार्थी व पालकांची प्रचंड गर्दी झाली होती. सविस्तर वृत्तांत असा की,प्रा.डी.के.नागवे सरांची मॅथ्स ॲण्ड सायन्स अकॅडमीने आयोजित केलेल्या गौरव गुणवंताचा सोहळा आनंदाचा-२०२४ या कार्यक्रमाचे उद्घाटक व अध्यक्ष बीड जिल्ह्याचे आरोग्य सेवक म्हणून ज्यांची ओळख असणारे मा.श्री.बाजीरावजी चव्हाण साहेब तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्यानकार प्रा.नितीनजी बानगुडे पाटील तर नगराध्यक्ष शेषरावजी जगताप, उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे,एपीआय अमनजी सिरसट साहेब आदीची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीला हार घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली



सर्व मान्यवरांचा सत्कार झाल्यानंतर प्रा.डी.के.नागवे सरांची मॅथ्स ॲण्ड सायन्स अकॅडमी मधील इयत्ता- ८ वी.मधील एनएमएमएस शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेले विद्यार्थी खवेतोड निलेश,मस्के समृद्धी, माने दिव्या, मस्के आदित्य,गोरे सोहम, घुमरे आदित्य, शिंपले आदित्य, मुळे तेजस्विनी, माने श्रद्धा, खोटे संस्कार, गोंडे सिद्धी, मुजमुले शुभम,मोहिते वैष्णवी, खोजे समृद्धी, लांडे सार्थक,केदार सिद्धांत, मस्के उत्कर्ष,जाधव युवराज, नरसाळे सार्थक,नागवे शुभम, गोंडे अनुराघ,लांडे हर्षद, नागवे नंदिनी तसेच इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या कचट तनुजा, तोंडे स्नेहा,पठाण शाहबाज,मस्के प्रणिता,टेकुळे गीता, बावडकर आदित्य, चव्हाण ज्ञानेश्वर, कस्पटे अंकिता,सिंपले पांडुरंग, मस्के अथर्व,आंधळे शिवानी, आडे निशा, नांदुरकर भक्ती, मस्के भक्ती, खोटे श्रुतिका, तोंडे सोनाली, पिंगळे प्रतीक,खोटे तेजस्विनी, मुंडे अस्मिता, गार्डे अनुष्का,कानडे योगिता, आंधळे मंगेश, सातपुते प्रणित आणि यादव श्रुती तसेच आरोग्य सेवक बाजीरावजी चव्हाण साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेत प्रथम आलेला चि.कदम पार्थ,द्वितीय चि. आंधळे वरद,तृतीय चि.कवचट शंभूराजे,चतुर्थ चि. खवेतोड निलेश,पंचम डोरले आदित्य वर्गानुसार द्वितीय आलेले कु. उंडाळे स्वरा,चि.कदम समर्थ, चि.तिडके सुमित, कु.मस्के समृद्धी,चि.कवचट ओमराजे या गुणवंत विद्यार्थ्यांच्या पालकासह मान्यवरांच्या शुभहस्त शाल,सन्मान चिन्ह व बक्षीस देऊन गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक असणारे मा.श्री.नितीनजी बानगुडे पाटील यांनी विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, परिस्थिती कुणालाही चांगलं किंवा वाईट बनवत नसते तर आपण परिस्थितीला चांगलं किंवा वाईट बनू शकतो वेगवेगळ्या शास्त्रज्ञांचे उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण केली तसेच जो थांबला तो संपला आपल्या ध्येयापर्यंत पोहोचेपर्यंत तुम्ही थांबू नका आपले ध्येयावर लक्ष देऊन अभ्यास करा प्राध्यापक नागवे सर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडवण्याचं काम करत आहेत हे विद्यार्थी भविष्यात वडवणी तालुक्याच्या,राज्याच्या आणि देशाच्या विकासामध्ये योगदान दिल्याशिवाय राहणार नाहीत असे मत त्यांनी व्यक्त केले तसेच अध्यक्ष विचार व्यक्त करताना आरोग्य सेवक बाजीराव चव्हाण साहेब यांनी गुणवंत विद्यार्थ्यांच कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले व प्रा.नागवे सरांच्या क्लासेसला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक अकॅडमीचे संचालक प्रा.डी.के.नागवे सर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार रोहन ताकमोगे सर यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री.भागवतराव नागवे,गगनगिरी केसरी, दोन चांदीच्या गद्यांचे मानकरी असलेले पै.कृष्णाजी नागवे,उर्मिला काळे मॅडम,रोहन ताकमोगे सर व अकॅडमी मधील सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाला विद्यार्थी व पालक यांची प्रचंड गर्दी झाली होती.

## आष्टी-पाटोदा-शिरुर विधानसभेतून आम आदमी पार्टीतर्फे आस्मान जरांगे पाटील निवडणुक लढवणार-गिरी,आघाव

बीड । प्रतिनिधी

येणार्या विधानसभा निवडणुकीमध्ये आम आदमी पार्टीतर्फे जिल्ह्यातील सर्वात मोठा मतदारसंघ असलेला आष्टी-पाटोदा-शिरुरच्या विधानसभेतून आस्मान जरांगे पाटील निवडणुक लढवणार असल्याची माहिती पक्षाचे शहराध्यक्ष विष्णुपंत गिरी, दहिवंडीचे सर्कलप्रमुख नारायण आघाव, दहिवंडीचे शाखा प्रमुख संजय आघाव, कोळवाडीचे शाखाप्रमुख अंबु जाधव यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.



पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे शिक्षण, आरोग्य, रोजगार आदी कामे पाहता देशामध्ये आम आदमी पार्टीची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत असून आम आदमी पार्टी हा पक्ष भ्रष्टाचारमुक्त राजकारण करत आहे त्यामुळे पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा हा अल्पावधीतच प्राप्त झाला आहे. अशातच महाराष्ट्र राज्यात राजकारणात बावळटगिरी, आमदार-खासदार विकत घेणे, पक्षफोडीची वृत्ती विकास कामात टक्केवारी खाणे यामुळे महाराष्ट्रातील राजकारण कीडयुक्त झाले आहे. त्यामुळे लागलेली कीड संपुष्टात आणण्यासाठी व शेतकर्यांचे, सुशिक्षित बेकारांचे, महीलांचे, कंत्राटी नौकर वर्गीयांचे कामे करण्यासाठी आम आदमी पार्टी राज्यातील सर्व २८८ विधानसभा लढवणार आहे असेही पत्रकाद्वारे आम आदमी पार्टीकडून कळविण्यात आले आहे.

## जायकवाडी येथे आझाद क्रांती सेनेच्या शाखेची स्थापना

**माजलगाव । प्रतिनिधी**

दिनांक २३ जुलै २०२४ रोजी जायकोवाडी तालुका माजलगाव जिल्हा बीड येथे आझाद क्रांती सेनेच्या शाखेचे उद्घाटन आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश जी घोडे व अखिल बिल्डर यांच्या हस्ते पाच वाजता करण्यात आले याप्रसंगी बोलताना राजेश घोडे म्हणाले की तुम्ही जो शाखेचा बोर्ड लावला आहे हा फक्त बोर्ड नसून ही एक विचारधारा आहे ही विचारधारा म्हणजे देशामध्ये सामाजिक आर्थिक व राजकीय विषमता आहे या सर्व विषमता जाळण्यासाठी आझाद क्रांती सेना इथून पुढे काम करणार आहे १८ पगड जाती समूहाला सोबत घेऊन गावाकुसा बाहेरील माणसांचे प्रश्न आझाद क्रांती सेना



गल्लीपासून ते दिल्लीच्या तक्तापर्यंत पोहोचवण्याचं काम भविष्यात करणार आहे व सर्वसामान्यांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी इथल्या व्यवस्थेशी कायम झगडत राहणार आहे यासाठी हा विचार आज आपल्या गावामध्ये आलेला आहे तो विचार आपण गावागावांमध्ये घेऊन जाण्याचं काम करावं असं या प्रसन्न बोलताना राजेश घोडे म्हणाले

शाखाध्यक्ष संजय हिवाळे, उपाध्यक्ष अरुण पिसुळे, सचिव करण थोरात, व सल्लागार वसंत थोरात यांनी गावच्या प्रश्नांची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावरती घेतली आहे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बळी थोरात, सुरेश थोरात, सुरेश पिसुळे, उमेश थोरात, राहुल थोरात, विशाल थोरात लक्ष्मण थोरात, विलास थोरात, भारत गायकवाड, नवनाथ लोंढे ,अमोल पिसुळे, अर्जुन थोरात परमेश्वर थोरात बंडू थोरात राजेश शेवाळे मदन थोरात रोहिदास शेवाळे अजय थोरात कृष्ण थोरात करण थोरात आदिने परिश्रम घेतले

पान ६ वरून...

### मुख्यमंत्री शिंदे यांचे हात

शिवसेना पदाधिकारी मुंबई येथे मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या भेटीला जाणार आहेत. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना महिला आघाडी संपर्कप्रमुख सविता किंवांडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडलेल्या शिवसेना महिला आघाडी जिल्हा बैठकीत जिल्हाप्रमुख रत्नमाला आंधळे, सहसंपर्कप्रमुख सुमन गोरे, सचिव शकुंतला गोगाशे, पाटोदा तालुकाप्रमुख मनीषा रामपुरे, गेवराई तालुकाप्रमुख गंगा खेवणे, गेवराई सर्कल शितल पुंडुरे, बीड तालुका प्रमुख मंगल गायकवाड, उप तालुकाप्रमुख वैशाली घोंगडे, शहर प्रमुख सुरेखा परसे, उपशहर प्रमुख ऊज्वला खरात, उपतालुकाप्रमुख गेवराई मनीषा जाधव आणि उप सर्कल गेवराई सुरेखा पोहे यांची उपस्थिती होती. याबरोबरच शिवसेना शहरप्रमुख नंदकिशोर पिंगळे यांनी बीड शहर पदाधिकाऱ्यांच्या घेतलेल्या बैठकीत शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे , हनुमानप्रसाद पांडे, नवनाथ शिंदे, आकाश वाघमारे, आबासाहेब जाधव, अनिकेत नाटकर व आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### जिथे ओबीसी मेळावे तिथ

होऊन आपली शक्ती दाखवून आपले आरक्षण वाचवणे आवश्यक आहे. मंडल आयोग लागू कारणे, ओबीसी आरक्षणात कुणाचीही सहभाग करु नये, सर्व जातीची जनगणना करावी,ओबीसी महामंडळाची कर्ज माफी करावी,२ हजार कोटी भांडवल देण्यात यावे, लोकसभा -विधान सभेत ओबीसीला आरक्षण मिळाले पाहिजे, ओबीसी वस्तीवर गावात सर्व सुविधा शासनाने पुरवल्या पाहिजे. या प्रमुख मागण्यांसाठी हा एल्गार असून त्यामुळे सर्वांनी पक्ष भेद बाजूला सारून ओबीसी साठी लढाई अंतिम टप्प्यात आली असून आपण मोठ्या ताकतीने सहभागी होऊन राज्यात होणाऱ्या मेळावे, रॅली ,सभा ,कार्यक्रमात सहभागी होऊन बहुजनांच्या सर्वच नेत्यांचे हात बळकट करून त्यांना ताकत देण्याचे स्वखर्चाने ,आर्थिक मदत देऊन घरचे आंदोलन म्हणून सहभागी व्हावे. आवाहन ओबीसी नेते प्रा.वैजेनाथ शिंदे,सरपंच भगवान शिंदे,सरपंच महादेव ढगे, सरपंच आसाराम ढगे,सदस्य संतोष सत्वधार ,बंशी लेंडळ,सरपंच सचिन हाळकर.नारायण नाईकनवरे, गीताराम गणगे ,बंडू ढगे, दीपक सोगे,दिलीप गवळी आदींची उपस्थिती होती.

### धारूर तालुक्यातील खिदमतमाश

माफीचाशी संगणमत करून खिदमतमाश जमिनीची खरेदी-विक्री केलेली आहे. व वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करून कोट्यावधी रुपयांची माया भुखंड माफियांच्या घशात घातलेली आहे.

धारूर तालुक्यातील ईनामी जमीनी सर्वे नं. ३६२ , ३६७ , ३७० , ६२२ , ६२३ , ६२४ , ५९९ , ५०२ , ५४८ , १०. ५४८ / ११. ५४८ / १३.५४८, १३५ , १८३ , १८५ ,१८६ , १८७ , १३३ , १८४ ,१८५ , ५५४ ,२०५ , २०६ , ३४३ , ३५ , ३५१, ३५२, ३५४, ३५६, ३५७, ३६०, ३४.३६५, ३७२,३७६, ५५१, ५६३, ५६०, ६३२, ६२४, ५९९, ३.५.३५३,५४२,५५६,४४३,५०.५४४,५५६,४४६,५४७,५५९, ५७४,५६७,५६८,५९२,१७३,१७४, १७५,१७६,५६१, २७.२३९,३६९, २४९, ५६६, ६१०,२४०,२४९,४०५,२८.२९ प्रमाणे आहेत. या मधिल सर्वे नं.३६९ ही जमीन शासनाने तात्काळ ताब्यात घ्यावी. या प्रकरणावर पडदा टाकण्याचे काम आपल्या कार्यालयातील श्री जवादे व खळगे मॅडम करत असून माहिती देण्यास सतत टाळाटाळ करत असतात असेही निवेदनात नमूद केले आहे. या अगोदरही याच प्रकरणात तीन वेळेस चौकशी समितीची नेमणूक केली होती व तिन्ही वेळा हा प्रकार अर्थपूर्ण दडपण्यात आला असून सदरील प्रकरण मा. उपविभागीय अधिकारी यांनी जायमोक्यावर जाऊन स्वतः पाहणी करून आपल्याकडे असलेले ईनामी जमीनीचे विलंब माफ करून मालकीत देवस्थान घेण्यात यावे तसेच धारूर तालुक्यातील इनामी जमीनीचे आत्ता पर्यंत झालेले सर्व फेरफार रद्द करण्यात यावे व या प्रकरणातील दोषी अधिकारी व कर्मचारी यांना निलंबीत करून योग्य ती कारवाई करण्यात यावी अन्यथा आपल्या कार्यालया समोर अमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा जेष्ठ नेते तथा आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलिम बापु यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

### माजलगाव येथे पूजनीय

धाईजे, निलेशजी कांबळे यांनी पूजनिय भंते यांना पुष्प देऊन वंदन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कचरू तात्या खळगे यांनी केले या कार्यक्रमास भीमनगर व परिसरातील महिला मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या या कार्यक्रमाच्या निमित्याने सर्व वातावरण धम्मय झाले होते सदरील कार्यक्रम तीन महिने चालणारा असून यामधून धम्म चळवळ गतिमान होण्यास मदत होईल असे भन्ते धम्मशिल यांनी त्यांनी त्यांच्या प्रवचनात सांगितले. तसेच या कार्यक्रमास सद् धम्म सेवा संघाचे कार्याध्यक्ष भगवानराव सातपुते,सचिव जी एन घनगाव हे उपस्थित होते.

### मुख्यमंत्री-माझी लाडकी

खाते उघडल्यास महिलांना मदत होणार आहे. हीच बाब विचारात घेऊन, ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना'' या शासन योजने अंतर्गत भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनूसार नागरी सहकारी बँकांमध्ये खाती उघडण्यात यावीत अशा शासन मान्यतेचे पत्र नुकतेच दि १९/७/२०२४ रोजी शासनाच्या सहकार आयुक्त कार्यालयाकडून जाहीर करण्यात आले आहे. याच शासकीय मान्यता पत्राच्या अनुषंगाने अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक लि. अंबाजोगाई ही बँक महिलांना कसलाही नाहक त्रास न होऊ देता केवळ १००/- रुपयात त्यांचे खाते उघडून देणार आहे. बँकेच्या चौसळकर कॉलनी, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथील शाखेत तसेच जोगाईवाडी येथील शाखेत केवळ १००/- रुपयात आपली खाती उघडून घ्यावीत असे आवाहन बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी केले आहे. यापूर्वीही अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या रौप्य महोत्सवी वर्षामुळे अंबाजोगाई परिसरातील महिलांना बँकिंग क्षेत्राविषयी माहिती व्हावी म्हणून महिलांच्या साठी बँकिंग प्रशिक्षण शिबिराचे अयोजन करण्यात आले होते. त्याच बरोबर कोव्हिडं काळात देखील सामाजिक सेवाभाव म्हणून महिलांच्या साठी १००/- रुपयात त्यांची खाती सुरू करण्यात आली होती.

## माजी सरपंच प्रकाश गोरटे यांना मातृशोक

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

जिजाबाई रामराव गोरटे (वय १००) यांचे दिनांक २२ जुलैच्या सकाळी पाच वाजण्याच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले.



चार महिन्यापूर्वी माजी सरपंच प्रकाश रामराव गोरटे व बालासाहेब रामराव गोरटे या भावंडांनी आपल्या मातोश्रीचा वाढदिवस तब्बल सात दिवसाचा भागवत सप्ताह ठेवून धुमधडाक्यात साजरा केला होता. या भागवत सप्ताहाचा आनंद पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या उत्साहाने घेतला होता. ह.भ.प.डोंगरे महाराज यांच्या नेतृत्वाखाली सप्ताह पार पडल्यानंतर अवघ्या चार महिन्यानंतर अल्पशा आजाराने हिप्परगा कोपदेव येथील जुन्या पिढीतील सर्वांची ''माय' म्हणून परिचित असलेल्या जिजाबाई रामराव गोरटे यांनी (वय १०० वर्ष) यांचे २२ जुलै सोमवारच्या सकाळी पाच वाजण्याच्या सुमारास अखेरचा श्वास घेतला. पंचक्रोशीतील नागरिक गावातील महिला पुरुष माजी मंत्री विनायकराव पाटील, माजी मंत्री बाळासाहेब जाधव मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत कोपदेव हिप्परगा येथेच त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात बालासाहेब गोरटे, माजी सरपंच प्रकाश गोरटे ही दोन मुले, एक मुलगी आनंत, विठ्ठल, संगीत शिक्षक रविकांत, अभियंता शशिकांत ही नातवंडे सुना,चार नाती पतवंडे असे पाच पिढ्यातील साक्षीदार आहेत.

## ढगाळ वातावरण संततधार पाऊस आपत्कालीन परिस्थितीमध्ये करा पिकांचे योग्य व्यवस्थापन -येळकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

यावर्षी सतत ढगाळ वातावरण आणि संततधर पाऊस पडत असल्याकारणाने बऱ्याच ठिकाणी शेतांतील पिकांमध्ये पाणी साचून राहिल्यामुळे. मातीमधील ओलावा वाजवीपेक्षा जास्त होऊन खेळत्या हवेचे प्रमाण कमी झाले आहे. परिणामी झाडास अपुरा प्राणवायूचा पुरवठा आणि जिवाणूंच्या व मुळांच्या श्वसन प्रक्रियेस अडथळा निर्माण झाल्यामुळे कापूस, सोयाबीन, तूर, मूग इत्यादी पिकांच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होऊन पीक पिवळे पडत आहे तसेच मुळ्या सडत असल्याकारणाने पिकांची रोपे नष्ट होत आहेत. अशा आपत्कालीन परिस्थितीमध्ये पिकांचे व्यवस्थापन करण्यासाठी करावयाचा उपायोजनाबाबत ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी खालील प्रमाणे सल्ला दिला आहे. जमिनीमधील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी उताराला चर तयार



करावेत, पिक पिवळसर दिसत असल्यास पानांद्वारे अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी १३:४०:१३ हे फॉलियर ग्रेड विद्राव्य खत ५ ग्रॅम अधिक मॅग्नेशियम सल्फेट दोन ग्रॅम अधिक महाराष्ट्र ग्रेड दोन सूक्ष्म अन्नद्रव्य दोन ग्रॅम प्रति एक लिटर पाण्यातून फवारणी करावी. सोयाबीन पिकामध्ये अळीवर्गीय किडींचा व्यवस्थापनासाठी क्लोरॅंट्रानिलीप्रोल ९.३% अधिक लॅंबडा सायहॅलोथ्रीन ४.६% झेडसी पूर्वमिश्रित कीटकनाशक ८० मिली किंवा क्लोरॅंट्रानिलीप्रोल १८.५ एससी ६० मिली किंवा टेट्रानिलीप्रोल १८.१८% एससी १०० मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट १.९% ईसी १०० मिली किंवा आयसोसायक्लोसिरम ९.२% डीसी १२० मिली किंवा फ़्ल्युबेन्डामाईड २०% डब्ल्युजी १०० ग्रॅम किंवा फ़्ल्युबेन्डामाईड ३९.३५% एससी ६० मिली किंवा इन्डोक्झाकार्ब १५.८% ईसी १२० मिली किंवा प्रोफेनोफॉस ५०% ईसी ४०० मिली यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची २०० लिटर पाण्यामध्ये मिसळून एक एकर क्षेत्रासाठी फवारणी करावी. तुर पिकाची समाधानकारक वाढ झाली असल्यास शेंडे खुडणी करावी व कार्बेन्डाझीम (५० डब्ल्यूपी) १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कापूस पिकामध्ये आकस्मिक मर निदर्शनास येत असेल तर तात्काळ २०० ग्रॅम युरिया अधिक १०० ग्रॅम पोटॅश अधिक २५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड प्रति १० लिटर पाण्यात मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १५० मिली याप्रमाणे आळवणी करावी. वेगवेगळ्या कीडनाशकांची मिश्रणे एकत्र करू नये, कीटकनाशकासोबत विद्रव्य खते, संप्रेरके इत्यादी मिसळू नये. फवारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याचा सामू ५-७ असावा. कीटकनाशकाच्या डब्यावरील सूचना वाचून त्याचे पालन करावे व फवारणी करताना सुरक्षा साधनांचा वापर करावा असा सल्ला ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी दिला आहे.

## आष्टीचा भूमिपुत्र शिवाजी हंबर्डे अमरनाथ यात्रेत गुंफेजवळ देवदूत म्हणून देतोय पहारा

### भाविकांचे दर्शन सुखकर होण्यासाठी जवानांची जीवाची बाजी..त्यांच्या कार्याला सलाम

**आष्टी । प्रतिनिधी**

अमरनाथ यात्रेला जुलै महिन्यात सुरुवात झाली. अनेक भाविक दर्शनासाठी येतात अमरनाथ यात्रेच्या पार्श्वभूमीवर दहशतवाद्यांचा कारवायांना आळा घालण्यासाठी आपले जवान राहून भाविकांसाठी देवदूत म्हणून यात्रा काळात तैनात असतात.यावर्षीच्या यात्रा बंदोबस्ताच्या तुकडीत आष्टीचे भूमिपुत्र शिवाजी हंबर्डे हा लष्करातील जवान आपल्या जीवाची बाजी लावून भाविकांची मदत करत आहेत.आष्टी तालुक्यासह महाराष्ट्रातील अनेक भाविक अमरनाथ यात्रेला गेलेल्या भाविकांची मनोभावे सेवा शिवाजी अरुण हंबर्डे यांनी केले असून या सेवेबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

आष्टी शहरातील हंबर्डे वस्ती येथील भूमिपुत्र असलेला भारत तिब्बत सीमा



पोलीस दलात हवालदार म्हणून कार्यरत असलेला शिवाजी अरुण हंबर्डे हा जवान

अमरनाथ यात्रेत आपले कर्तव्य बजावत आहे. २००३ भरती होत देशसेवेत त्याने दिल्लीसह केदारनाथ मंदिर ढगफुटी ढगफुटी आपत्ती असो किंवा सिक्कीम येथील भूकंप असो नेपाळ येथील भूकंप अशा अनेक आपत्तीत त्यानी एनडीआरएफ च्या दलात काम करून आपत्तीग्रस्त भागात आपले कर्तव्य बजावले आहे. यावर्षी सुरू असलेल्या पवित्र अमरनाथ बर्फानी बाबा यात्रेच्या गुफेजवळ आपले कर्तव्य बजावत आहे. दररोज अनेक भाविकांची सेवा करण्याचे काम तो करत आहे. हिमालयाच्या कुशीत कर्तव्य बजावणे म्हणजे आपल्या जीवाची बाजी लावून देशाची सेवा करणे होय मात्र हवालदार शिवाजी हंबर्डे हा जवान देश सेवा हीच ईश्वर सेवा असे मनात धरून देशाची सेवा करत अमरनाथ यात्रेत पहाटे ५ ते रात्री ९ वाजेपर्यंत आपले कर्तव्य बजावत आहे. तो एक महिनाभर अमरनाथ यात्रेच्या गुफेजवळ आपले कर्तव्य बजावत असून त्यांच्या या कार्याला सलाम.त्यांच्या तुकडीत ३२ जवान कार्यरत असून भाविकांना होणाऱ्या त्रासामध्ये मदत करणे भाविकांना बर्फानी बाबाच्या दर्शनात काही अडचण असल्यास त्यांना मार्गदर्शन करतात.अनेक अडचणींवर मात करून अमरनाथ बाबा बर्फानीचे आपले जवान भाविकांचे दर्शन घडवून आणतात.जवानांच्या सहकार्याने दर्शन अतिशय सुखकर होते. अनेक भाविकांना आम्ही या काळात मदत केली आहे. महाराष्ट्रातील भाविक अमरनाथ यात्रेत आपल्या मातीतील माणसं भेटल्याने मनाला वेगळेच समाधान होते अशी भावना यावेळी शिवाजी हंबर्डे यांनी व्यक्त केली.

## पैठण पंढरपूर पालखी

ॲड . नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांच्या मार्फत दाखल केली होती सदरील याचिकेची सुनावणी दिनांक १८.०७ . २०२४ रोजी माननीय न्यायमूर्ती आर . व्ही . घुगे व माननीय न्यायमूर्ती वाय.जी. खोब्रागडे यांच्यापुढे झाली असता माननीय उच्च न्यायालयाने प्रतिवादी क्र . ४ व ५ कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण बांधकाम विभाग पदमपुरा औरंगाबाद व उपविभागीय अभियंता माजलगाव यांच्या शपथपत्राची नोंद घेऊन पैठण पंढरपूर पालखी महामार्ग दि . ३१.१२.२०२४ पर्यंत पूर्ण करावा तसेच सर्व संबंधित खात्यांनी सदरील काम पूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे असे आदेश दिले . व सदरील जनहितार्थ याचिका निकाली काढली . याचीकाकर्त्याच्या वतीने ॲड . नरसिंह जाधव यांनी काम पाहिले व त्यांना ॲड . राकेश ब्राम्हणकर यांनी सहकार्य केले

cmyk

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार

गुरूवार दि.२५ जुलै २०२४

४

# बांग्लादेशने संत्र्यावरील आयात शुल्क वाढविले

## संत्रा उत्पादक शेतकरी अडचणीत!

पुणे : नागपूरी संत्र्यावरील आयात शुल्कामध्ये बांगलादेश सरकारने पाच वर्षांत ५०५ टक्के तर मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी ११४.७७ टक्क्यांनी वाढ केली आहे. वाढत्या आयात शुल्कामुळे यावर्षी बांगलादेशातील संत्रा निर्यात आणखी मंदावणार आहेत. दुसरीकडे, देशाअंतर्गत बाजारात संत्रा विक्रीचे प्रभावी नेटवर्क नसल्याने आगामी हंगामात संत्र्याचे दर दबावात राहण्याची व संत्रा उत्पादकांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता वाढली आहे.

विदर्भातील १ लाख ६० हजार हेक्टर मधील संत्रा बागा उत्पादनक्षम आहेत. या बागांपासून दरवर्षी किमान ७.५० ते ८ लाख टन संत्र्याचे उत्पादन होत असून, यात सरासरी ४.५० ते ५ लाख टन आंबिया आणि २.५० ते ३ लाख टन मृग बहाराच्या संत्र्याचा समावेश आहे. सन २०१९-२० पर्यंत यातील सरासरी २ ते २.५० लाख टन संत्र्याची निर्यात व्हायची. यातील किमान १.७५ लाख टन संत्रा बांगलादेशात निर्यात व्हायचा. केंद्र सरकारच्या शेतमाल निर्यातबंदी धोरणामुळे अडचणीत आलेल्या बांगलादेशने ऑक्टोबर २०१९ मध्ये पहिल्यांदा संत्र्यावर २० टका प्रति किलो आयात शुल्क लावला. यात वर्षागणिक वाढ करण्यात आल्याने सन २०२४ मध्ये हा आयात शुल्क १०१ टका



प्रति किलो करण्यात आला आहे. बांगलादेशातील सामान्य ग्राहकांना ६० ते ८० टका प्रति किलो संत्रा खरेदी करणे आर्थिकदृष्ट्या परवडते. आयात शुल्कामुळे हा १६१ ते १८१ टका प्रति किलो होणार असून, हा दर त्यांच्या आवाक्याबाहेर असल्याने ते इच्छा असूनही नागपूरी संत्रा खरेदी करणार नाहीत. बांगलादेशात संत्र्याची मागणी असूनही विक्री होणार नसल्याने निर्यात आणखी मंदावणार आहे. याचा विपरीत परिणाम संत्र्याच्या दरावर होणार आहे. नागपूरी संत्र्याला सरासरी ३० ते ३५ हजार रुपये प्रति टन भाव मिळायला हवा. सन २०२२ मध्ये काही शेतकर्यांना ४८ हजार रुपये प्रतिटन भाव मिळाला होता. मध्यंतरी संत्र्याचे दर ५० ते ६० हजार रुपये प्रति टनावर गेले होते. संत्र्याचे योग्य मार्केटिंग आणि विक्री नेटवर्क निर्माण केल्यास हा दर मिळणे कठीण नाही.

### संत्रा निर्यातीला ब्रेक

नागपूरी संत्र्याच्या बांगलादेशातील निर्यातीला सन २०२१-२२ मध्ये ब्रेक लागला. ही निर्यात पूर्ववत करणे व वाढविण्यासाठी तसेच देशाअंतर्गत बाजारात नागपूरी संत्र्याची मोठ्या प्रमाणात विक्री करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार अजूनही प्रभावी उपाय योजना करायला तयार नाहीत. याचा फायदा काही व्यापारी घेतात. देशाअंतर्गत बाजारात संत्रा विक्रीचे प्रभावी नेटवर्क नसल्याने शेतकर्यांना १५ ते २० रुपये प्रति किलो दराने संत्रा विकावा लागत असून, हाच संत्रा ग्राहकांना ६० ते ८० रुपये प्रति किलो दराने खरेदी करावा लागतो.

## जमिनीच्या नोंदीचे डिजिटायजेशन करण्यासाठी आता लवकरच येणार 'भू-आधार'!




आधार कार्डप्रमाणेच सहा कोटी शेतकऱ्याच्या जमिनीला भू-आधार कार्ड म्हणजेच युनिक लँड पार्सल आयडेंटिफिकेशन देण्यात येणार आहे. केंद्र सरकार राज्य सरकारच्या सहकार्याने ही योजना अंमलात आणली जाणार आहे.

विविध जमीन सुधारणांचा एक भाग म्हणून ग्रामीण आणि नागरी भागातील सर्व जमिनीसाठी भू आधार योजना राबवण्याचा प्रस्ताव सीतारामन यांनी या अर्थसंकल्पात मांडला आहे. सर्व जमिनीच्या नोंदीचे डिजिटायजेशन करण्याच्या उद्देशाने ही योजना आखण्यात आली आहे. गेल्या तीन वर्षांत ती पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकार राज्यांना वित्तीय साहाय्य करणार असल्याचे त्यांनी सांगीतले. याशिवाय पाच राज्यांत जनसमर्थन किसान क्रेडिट कार्ड दिली जाणार आहेत. त्याच प्रमाणे देशातील ४०० जिल्ह्यात खरीप पिकांचे डिजिटल सर्वेक्षण करण्यात येणार असल्याची घोषणाही सीतारामन यांनी केली. केंद्र सरकारने शेतीसाठी अर्थसंकल्पात १.५२ लाख कोटींची तरतूद केली असून, बागायती पिकांच्या हवामानास अनुकूल असणारे ३२ पिके आणि फळांच्या १०९ नवीन उच्च-उत्पादकता असणारे वाण विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार असल्याची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केली.

पुढील दोन वर्षात देशभरातील एक कोटी शेतकऱ्यांना प्रमाणपत्र व ब्रँडिंगच्या आधारे नैसर्गिक शेतीशी जोडले जाणार आहे. ग्रामपंचायत व वैज्ञानिक संस्थेच्या माध्यमातून याची अंमलबजावणी केली जाणार आहे. यासाठी गरजेनुसार १० हजार जैविक खतांची केंद्रे उभारली जाणार आहेत. डाळवर्गीय व तेलवर्गीय कृषी उत्पादनामध्ये स्वयंपूर्ण होण्यासाठी त्याचे उत्पादन, साठवणूक व विपणन व्यवस्था उभारण्यात येणार आहे. मोहरी, भुईमुग, तीळ, सोयाबीन व सूर्यफूलसारख्या तेलवर्गीय पिकांसाठी नवीन आराखडा बनवला जाणार आहे. याशिवाय प्रमुख ग्राहक केंद्राजीक भाजीपाला उत्पादनाचे क्लस्टर निर्माण करण्यात येतील. यासाठी कृषी उत्पादक सहकारी संस्थांना प्रोत्साहन दिले जाईल.

## दूधदरप्रश्नी प्रांताधिकारी कार्यालयासमोर शेण ओतून संताप



अकोले : दुधाला ४० रुपये दर मिळावा यांसह विविध मागण्यांसाठी कोतूळ (ता. अकोले) येथे सुरू असलेल्या आंदोलनाकडे दुर्लक्ष केले जात असल्याने कोतूळ ते संगमनेर अशी शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर रॅली काढण्यात आली. त्यात कोतूळसह परिसरातील मिळून सुमारे साडेतीनशेपेक्षा अधिक ट्रॅक्टर सहभागी झाले होते. आंदोलनकर्त्यांनी संगमनेर येथे प्रांत अधिकारी कार्यालयासमोर शेण ओतून शासनाच्या भूमिकेचा निषेध केला.

गाईच्या दुधाला ४० रुपये मिळावा, दुधाला एफआरपी व रेव्हेन्यू शेअरिंगचे धोरण लागू करावे, दूध भेसळ थांबावी, पशुखाद्यांचे दर कमी करावेत इत्यादी मागण्यांसाठी नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील कोतूळ येथे १८ दिवसांपासून ठिय्या आंदोलन सुरू आहे. मागण्यांकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याने मंगळवारी कोतूळ येथून संगमनेरपर्यंत ५५ किलोमीटर शेतकऱ्यांनी किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांच्या नेतृत्वाखाली ट्रॅक्टर रॅली काढली. सकाळी अकरा वाजता सुरू झालेली रॅली सव्वाचार वाजता प्रांत कार्यालयात पोहोचली. अकोले येथे रॅली थांबवून पोलिसांनी चर्चा करण्याचे आवाहन केले. चर्चा झाली, मात्र त्यानंतर रॅली संगमनेरला आली. एकाचवेळी साडेतीनशेपेक्षा अधिक ट्रॅक्टर शहरात आल्याने वाहतूक कोंडी झाली. प्रांताधिकाऱ्यांना आंदोलनकर्त्यांनी निवेदन दिले. मागणी मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू राहील. उलट आंदोलन अधिक तीव्र करू असा इशारा दिला. दरम्यान, मोठ्या प्रमाणात शेतकरी रॅलीत सहभागी झाले होते. शेतकरी नागरिकांनी रॅलीचे जागोजागी स्वागत केले.

## मिरची पिकातील पांढरी माशी नियंत्रण




सध्या सर्वच भागात मिरची पिकांमध्ये पांढरी माशीचा खुप मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव दिसून येत आहे. वातावरणातील सतत होणारे बदल, आर्द्रता, उष्णता याचा परिणाम म्हणून रसशोषक किडींचा वाढता प्रादुर्भाव दिसून येतो आहे. मिरची पिकांबरोबरच ईतरही पिकांमध्ये पांढरी माशीचा खुप मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. याचे कारण म्हणजे बदलत्या वातावरणाबरोबर दिवसेंदिवस कमी होत चाललेली जमिनिची सुपिकता आणि यामुळेच कमी होत असलेली पिकांची ही रोगप्रतिकारक क्षमता त्यामुळे सर्व प्रकारच्या रसशोषक किडींचा सर्व पिकांवर वाढता प्रादुर्भाव दिसून येत आहे.

ओळख व लक्षणे : १. पांढरी माशी ही कीड टोमॅटो, मिरची, वांगी, कोबी व फळ पिकांवर आढळते. २. या किडींचा आकार ०.५ मिमी पेक्षा कमी असतो. रंग भुरकट पांढरा व डोळ्याचा रंग लाल असतो. ३. या किडींच्या पंखावर पांढरी भुकटी असते. कोश व किडींचा आकार फुगीर, गोलाकार असतो. ४. पिल्ले व प्रौढ शरीरावर केस असतात. ५. ही कीड पिल्ले व प्रौढ या दोन्ही अवस्थेत पानांतील रस शोषण करते. ६. त्यामुळे पानांचा रंग पिवळसर होतो. या किडीच्या जास्त उद्रेकामुळे फुलगळ होते व फल धारणा होत नाही आणि पांढऱ्या माशीचे नियंत्रणकरणे खूप जास्त आवश्यक बनते.

जीवनक्रम : १. ३० दिवसांचा (अंडी, पिले, कोष आणि प्रौढ) पांढरी माशी किडीची मादी पानांच्या खालच्या बाजूला १५० ते २०० पर्यंत अंडी घालते. २. १० दिवसात अंडी उबवून त्यातून पिल्ले बाहेर पडतात. ही पिल्ले योग्य वास्तव्य शोधण्यासाठी झाडावर भटकतात. ३. वास्तव निश्चित झाल्यावर वनस्पतीच्या पेशी जलात आपली सोंड खुपसून त्यातील रस शोषण करतात. ४. या किडीची पूर्ण वाढ ७० ते ७५ दिवसात होते. वाढ झालेली कीड कोषावस्थेत जाते. ५. ही अवस्था १६० दिवस असते. त्यातुन नंतर पांढरी माशी बाहेर पडते.

प्रादुर्भावाची लक्षणे : १. पानांच्या कडा खालील बाजूस वळतात. तसेच पाने पिवळी पडतात. २. पिले आणि प्रौढ पानातील रस शोषून घेतात. ३. तसेच पांढऱ्या माशीच्या शरीरातून बाहेर पडणाऱ्या पारदर्शक चिकट द्रवावर काळ्या बुरशीची वाढ होते. ४. ही कीड पर्णगुच्छ (लीफ कर्ल) या विषाणूजन्य रोगाचा प्रसार करते. एकात्मिक किड नियंत्रण : १. जैविक नियंत्रण - बिव्हेरिया बॅसियाना + व्हर्टिसिलियम लेकॅनी किंवा मेटारायझिम ऍनिसोपली या जैविक उत्पादनाची ४ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे घेऊन फवारणी करावी. २. सेंद्रिय नियंत्रण - निम (१०००० ) किंवा गार्डप्लस किंवा निमकरंज अधिक फ़िश ऑईल या सेंद्रिय कीटकनाशकांची १.५ मिली प्रति लीटर पाणी यांप्रमाणे दर ७ ते १० दिवसाच्या कालावधीत फवारणी घ्यावी. ३. रासायनिक नियंत्रण - अ) रोपवाटिकेत रोपे उगवल्यानंतर अडमायर, बायर, इमिडाक्लोप्रिड ०.५ मिली अधिक धानुस्टीन, धानुका, कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणीसाठी वापर करावा. ब) पुर्नलागवड वेळी रोपांची मुळे खालील औषधाच्या द्रावणात बुडवावीत. रेजेंट, बायर, फिप्रोनिल (५%) १.५ मिली किंवा ॲक्टरा, सिजेंटा, थायामेथोक्झाम (२५%) ०.४ ग्रॅम प्रति लिटर पाणी यांप्रमाणे घ्यावे. क) लागवडीनंतर अरेवा,धानुका, थायमेथोक्झाम (२५%) ०.४ ग्रॅम १ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावे. ड) लागवडीनंतर फळे येण्यापूर्वी पेगासस, सिजेंटा, डायफेन्थुरान ( ५० पी.डब्ल्यू.पी. ) १ ग्रॅम किंवा वेटसिट, धानुका, फेनप्रोपॅथ्रीन ( ३० ईसी) १ मिली. प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणीसाठी घ्यावे.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६४८ : आदिलशहाच्या आज्ञेवरुन मुस्तफाखान याने जिंजीनजीक शहाजीराजे यांना कैद केले.
१९१७ : कॅनडात आयकर लागू झाला.
१९४३ : दुसरे महायुद्ध इटलीत बेनिटो मुसोलिनीची हकालपट्टी झाली.
१९७८ : जगातील पहिली 'टेस्ट ट्युब बेबी' लुईस जॉन ब्राऊन, इंग्लंडमधील लँकेशायर येथे जन्माला आली.
१९८४ : सोव्हिएत संघाची स्वेतलाना साव्हित्स्काया अंतराळात 'चालणारी' प्रथम महिला अंतराळवीर बनली.
१९९२ : स्पेनमधील बार्सिलोना येथे २५ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९९४ : इस्त्राएल व जॉर्डनमधे १९४८ पासुन सुरू असलेले युद्ध अधिकृतरित्या समाप्त
१९९७ : इजिप्तचे अध्यक्ष मोहम्मद होस्नी मुबारक यांची १९९५ च्या आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठी दिल्या जाणार्या जवाहरलाल नेहरू

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९९७ : के. आर. नारायणन भारताचे १० वे, पहिले दलित आणि पहिले मल्याळी राष्ट्रपती बनले.
१९९९ : लान्स आर्मस्ट्राँगने आपली पहिली टूर डी फ्रान्स सायकल शर्यत जिंकली.
२००७ : भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून श्रीमती प्रतिभा पाटील यांचा शपथविधी
२०२० : द्रौपदी मुर्मू यांनी भारताचे १५ वे राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली
१८७५ : जिम कॉर्बेट ब्रिटिश भारतीय वन्यजीवतज्ञ, शिकारी व लेखक (मृत्यू: १९ एप्रिल १९५५)
१९१९ : सुधीर फडके ऊर्फ 'बाबूजी' गायक व संगीतकार (मृत्यू: २९ जुलै २००२)
१९२२ : विश्वनाथ वामन तथा वसंत बापट कवी व संगीतकार (मृत्यू: १७ सप्टेंबर २००२)
१९२९ : सोमनाथ चटर्जी लोकसभेचे सभापती आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८० : गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका' समाजसुधारक, राष्ट्रवादी विचारसरणीचे व स्वदेशी चळवळीचे प्रणेते आणि पुणे सार्वजनिक सभेचे संस्थापक (जन्म: ९ एप्रिल १८२८)
१९७७ : कॅप्टन शिवरामपंत दामले पुण्यातील महाराष्ट्रीय मंडळाचे संस्थापक, लष्करी शिक्षणाचे प्रसारक (जन्म:)
२०१२ : बी. आर. इशारा चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथालेखक (जन्म: ७ सप्टेंबर १९३४)

# मुरघास बनवण्याची संपूर्ण माहिती

शेतकरी बांधव शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन हा व्यवसाय करतात. परंतु पशुपालन करत असताना त्याचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने करणे गरजेचे असते. पशुपालन करत असताना चारा व्यवस्थापन हा खूप महत्त्वाचा विषय आहे. कारण चारा व्यवस्थापन व्यवस्थित झाले, तरच पशुपालन व्यवसाय हा फायदेशीर ठरू शकतो. त्यासाठी वर्षभर पुरेल असं चारा व्यवस्थापन करणे गरजेचे आहे, यामध्ये हिरवा चारा, वाळलेला चारा अशा पद्धतीने वर्गीकरण करून त्याचे व्यवस्थापन करता येते. वाळला चारा आपण वर्षभर सहजरीत्या साठवण करून ठेवू शकतो, परंतु हिरवा चारा वर्षभर पुरेल अशा पद्धतीने त्याचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. यामध्ये ज्या भागांमध्ये पाण्याची उपलब्धता जास्त असेल, त्या भागात शेतकरी वर्षभर हिरवा चारा आपल्या शेतामध्ये पिकवू शकतात परंतु काही दुष्काळी भागामध्ये शेतीसाठी वर्षभर पाणी उपलब्ध होत नाही, अशा वेळेस जनावरांना वर्षभर हिरव्या चाऱ्याचे व्यवस्थापन करणे खूप अवघड होते. परंतु याला पर्याय म्हणून मुरघास करणे योग्य ठरू शकते मुरघास हा वर्षभर टिकू शकतो.

मुरघास म्हणजे काय? : मुरघास म्हणजे हिरव्या चाऱ्याची कुट्टी करून त्यामध्ये कल्चर, गुळपानी किंवा मिठ असे वेगवेगळे मिश्रण कुट्टी मध्ये एकत्र करून त्याला हवा विरहित किंवा हवाबंद जागेत साठवण करून ठेवणे. आपल्याला गरज लागेल त्यावेळेस तो वापरणे. अगदी सोप्या भाषेत सांगायचं झालं तर हिरव्या चाऱ्याचं लोणचं घालने यालाच मुरघास असे म्हणतात.

मुरघासासाठी जास्त फायदेशीर असलेली चारा पिके : यामध्ये मका, कडवळ, बाजरी ही सर्व पिके मुरघास करण्यासाठी सर्वात जास्त योग्य समजली जातात. यांना योग्य समजण्याचं कारण म्हणजे यामध्ये शर्करेचे प्रमाण जास्त असते त्याचबरोबर उसाचे वाढे देखील मुरघास बनवण्यासाठी वापरू शकता.

पिकाची कापणी केव्हा करावी : मूरघास बनवण्यासाठी चारा पिकाची कापणी करण्यासाठी



ते पीक तुऱ्यामध्ये किंवा चिकाऱ्या मध्ये असणे गरजेचे आहे. मका पिकाबद्दल बोलायचं झाल्यास, मक्याचे कणीस तयार होत असताना त्याच्या दाण्यामधून दुधासारखा रस येत असावा, तसेच कडवळ आणि ज्वारी हे पीक चिकाऱ्या मध्ये असणे गरजेचे आहे. ज्यावेळी मका, कडवळ, बाजरी ही पिके तुऱ्यामध्ये असतात त्यावेळी त्या पिकाच्या ताटामध्ये पूर्णपणे न्यूट्रिशन प्रोटीन इत्यादी घटक असतात. म्हणजे त्या पिकाचे सर्व अवशेष हे सर्व घटकांनी परिपूर्ण व पौष्टिक असतात, अशा वेळेस मुरघास केल्यास त्याचा जास्त फायदा होतो. परंतु या पिकांची कणसे त्यातील दाना पूर्ण पक्ष झाल्यास त्या पिकाच्या ताटामध्ये किंवा चिपाडामध्ये न्यूट्रिशन हे अजिबात राहत नाहीत. ते सर्व त्या पिकाच्या दाण्यांमध्ये एकवटतात अशावेळी पिकांच्या इतर चिपाडामध्ये किंवा ताटामध्ये पौष्टिकता नसते.

मुरघास साठवण्याची पद्धत : १. मुरघास साठवणीसाठी वेगवेगळ्या पद्धतींचा वापर केला जातो. २. यामध्ये पहिला प्रकार म्हणजे बॅगांचा वापर केला जातो. यामध्ये ५० किलो पासून तीन टनापर्यंत बॅग मिळतात. ३. बॅगमध्ये मुरघास भरण्याअगोदर त्याला आतून प्लास्टिक बॅग वापरली जाते. ४. दुसरी पद्धत म्हणजे खड्डा पद्धत यामध्ये जमिनीमध्ये खड्डा खोदून त्याला शेततळ्याचा कागद वापरून त्यामध्ये मुरघास साठवता येतो. ५. तिसऱ्या पद्धतीमध्ये बंकर पद्धत, बंकर पद्धतीमध्ये आपल्याला जमिनीच्या वरती हवाबंद असे बांधकाम करून त्यामध्ये मुरघास करता येतो. ६. चौथी पद्धत म्हणजे बेलर किंवा गठ्ठे पद्धत यामध्ये मशीन मध्ये मकाची कुट्टी भरून त्याची मशीनच्या आधारे दाब देऊन गठ्ठे बनवले जातात, व त्याला प्लास्टिक पेपरच्या सहाय्याने गुंडाळले जाते परंतु ही पद्धत जास्त खर्चिक असते.

मुरघास बनवण्यासाठी लागणारे साहित्य : चारा पिके (एकदल आणि द्विदल पिके प्रमाण ४:१). ५०० जीएसएम ची मुरघास बॅग. एकदल पिकासाठी १ किलो शिफारशीत फीड ग्रेड यूरिया + १०० लीटर पानी / २०० किलो चाऱ्यासाठी). द्विदल पिकांसाठी ४ किलो गूळ + १०० लीटर पानी / २०० किलो चाऱ्यासाठी). चारा कुट्टी मशीन.

मुरघास तयार करण्याची पद्धत : सर्व प्रथम मार्केट मधून चांगल्या प्रतीची मुरघास बॅग खरेदी करा. या बॅग ची साइज तुम्ही तुमच्या गरजेनुसार निवडू शकता. जशी की १, २ किंवा ५ टन. बॅग चा रंग हा पांढरा निवडावा. यानंतर निवडलेल्या पिकाची फुलोरा अवस्थेमध्ये असताना बारीक कुट्टी करून घ्यावी. या वेळी पिकामध्ये योग्य ओलावा असेल याची काळजी घ्यावी व कुट्टी नंतर ओलावा कमी होणार नाही याची देखील काळजी घ्यावी. म्हणजे लगेच चारा बॅगेत भरावा. चारा बॅगेत १ फुटापर्यंत भरावा आणि लगेच पायाने दाबून घ्यावा, जेणेकरून त्याच्यामध्ये हवा राहणार नाही. कारण जर बॅगेत हवा राहिली तर त्यामध्ये बुरशी लागू शकते. अश्याप्रकारे टप्पा-टप्पाने थर देऊन बॅग भरून घ्यावी व प्रत्येक थरावर, एकदल पिकासाठी १ किलो शिफारशीत फीड ग्रेड यूरिया + १०० लीटर पानी प्रमाणे २०० किलो चाऱ्यासाठी फवारणी करावी. जर तुमच्याकडे द्विदल पिके असतील तर द्विदल पिकांसाठी ४ किलो गूळ + १०० लीटर पानी या प्रमाणे २०० किलो चाऱ्यासाठी फवारणी करावी. अश्याप्रकारे तुमचा एका चौरस फुटामध्ये तुमचं १५ ते १६ किलो मुरघास तयार होईल. नंतर भरलेली बॅग सुरक्षित जागी सावलीला ठेऊन द्यावी. पुढील ४५ ते ५० दिवसात अगदी चांगल्या प्रकारचा चारा तयार होईल. तयार झालेला चारा तुम्ही पुढील ५ ते ६ महिने वापरू शकता.

जनावरांना मुरघास किती द्यावा? : गाई व म्हशीचे २० ते २५ किलो मुरघास द्यावा. हा चारा दिवसातून २ ते ३ वेळा द्यावा. चारा जर जास्तच आंबट किंवा आम्लयुक्त असेल तर तो थोडा वेळ सुकून द्यावा. शेळी आणि मेंढीला हा चारा ५०० ते ७०० ग्राम द्यावा. दुधाळ जनावरांना हा चारा धारा काढल्यानंतर द्यावा.

मूरघास वापरण्याचे फायदे

मुरघास अवघ्या ४५ ते ५० दिवसात तयार होतो, आणि तो पुढील ५ ते ६ महीने वापरता येतो. जेणेकरून शेत पुढील पिकासाठी मोकळे होते व उन्हाळी हंगामात देखील जनावरांना सकस आणि हिरवा चारा देता येतो. कमी शेत जमीन असलेल्या शेतकऱ्यांना हा उत्तम पर्याय आहे. दुष्काळी भागात देखील उन्हाळी हंगामात जनावरांना हिरवा चारा देता येतो. मुरघासामध्ये इतर चाऱ्यापेक्षा अधिक सकस घटक असल्या मुळे जनावरांचे दूध देखील वाढते. सतत हिरवा आणि सकस चारा दिल्यामुळे जनावरांचे आरोग्य देखील चांगले राहते. कमीत-कमी जमिनीसह अधिक जनावरांचा गोठा सांभाळणे शक्य होते. शेतकऱ्याचा चाऱ्यावरील खर्च कमी होतो.

cmyk

## थोडक्यात

### डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेचा लाभ उचलवा

बीड : मदरशामध्ये पायाभूत सुविधा निर्माण होण्यासाठी डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजने अंतर्गत आर्थिक लाभ उचलावा, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी यांच्याकडून बीड जिल्हयात चालणा-या मदरशांना करण्यात आले आहे.अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासन निर्णय दि. ११ ऑक्टोबर २०१३ अन्वये राज्यातील मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभुत सुविधा निर्माण करणे, ग्रंथालयासाठी अनुदान, शिक्षकांचे मानधन इत्यादी लाभ देण्यासाठी योजना सन २०१३- १४ पासून राबविण्यात येत आहे. सदर योजना सन २०२४-२५ या वर्षात राबविण्याबाबत अल्पसंख्याक विकास विभाग, परिपत्रक अविवि-२०२४/प्र.क्र.६७/का.६, दिनांक -१९-०७-२०२४ अन्वये कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने इच्छुक मदरशांनी या योजने अंतर्गत विहित नमूण्यात रितसर परिपूर्ण प्रस्ताव दिनांक ११-१०-२०१३ व दिनांक २२-१०-२०२३ च्या शासन निर्णयाप्रमाणे जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, बीड या कार्यालयात दिनांक १५ सप्टेंबर २०२४ दुपारी ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

### शाळांच्या पायाभूत सुविधेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

बीड : धार्मिक अल्पसंख्यांक बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित/ विना अनुदानित/ कायम विना अनुदानित, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालीका/ नगरपरिषद शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन जिल्हा नियोजन तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी यांनी केले आहे.

अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासन निर्णय दि. ०७-१०-१५ अन्वये राज्यातील धार्मिक अल्पसंख्याकं बहूल शासनमान्य खाजगी अनुदानित/ विना अनुदानित/ कायम विना अनुदानित, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका/ नगर परिषद शाळा व अपंग शाळामध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे. सदर योजना सन २०२४-२५ या वर्षात राबविण्यातबाबत अल्पसंख्याक विकास विभाग, परिपत्रक अविवि-२०२४/प्र.क्र.६७/का.६, दिनांक १९-०७-२०२४ अन्वये कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने संस्थाचालकांनी या योजन अंतर्गतचे प्रस्ताव दिनांक ०१-१०-२०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे विहित नमूण्यात रितसर परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, बीड या कार्यालयात दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी दुपारी ५.०० वाजे पर्यंत सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

### सरकार बचाव कुर्सी बचाव बजेट-प्रा.सुशीला मोराळे

बीड : काल लोकसभेत एनडीए ३ सरकारने आपले बजेट पेश केले. या बजेटमध्ये नवीन काहीच नाही जुन्या बाटलीचा ब्रँड बदलतात तसेच हे बजेट आहे. रुपया कसा येणार कुठून येणार याबाबत मौन पाळले आहे. जाणार कसा हेही गुलदस्त्यात आहे. काँग्रेसच्या मेनी फेटोतील अनेक मुद्दे केंद्र सरकारने चोरले आहेत. खरं म्हणजे मुख्य बजेट पूर्वी रेल्वेचे बजेट संसदेत मांडले जाते परंतु सरकारने हा नियम रद्द केला आहे आणि रेल्वे बाबत काही धोरण जाहीर केलेले नाही रोज रेल्वेचे अपघात होत आहेत त्यालाही सरकारने नजर अंदाज केले आहे. बिहार आणि आंध्र प्रदेशला खुश करण्यासाठी केलेली तरतूदही त्यांच्या तोंडाला पाणी पुसणारी आहे. आंध्र प्रदेशाला १५००० कोटी दिले आहेत मात्र त्यांच्यावर ४५ हजार कोटीचे आधीच कर्ज आहे. बिहारला विशेष दर्जाबाबत मोदींनी भ्र शब्दही काढला नाही. युवकांसाठी तर हे बजेट उदासीन आहे शेतकऱ्यांच्या एम एस पी साठी बजेटमध्ये तरतूद नाही लखपती महिला योजना बजेटमध्ये गुंडाळली आहे. एकंदर हे बजेट म्हणजे सरकार बचाव कूर्सी बचाव स्वरूपाचे असल्याची प्रतिक्रिया किसान संघर्ष समितीच्या प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी दिली आहे.

# साडे ६ कोटी खर्चून बांधलेले कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्र उद्‌घाटनाच्या प्रतिक्षेत

## जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ यांना निवेदने




पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथील सर्व सोयींनी युक्त प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य ईमारत आणि वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या निवासस्थानासाठी ६ कोटी ३१ लाख रुपये खर्च करण्यात आला असुन २ वर्षांपूर्वी बांधकाम पूर्ण झालेले आहे मात्र शासनाच्या लालफितीत आणि कंत्राटी कर्मचारी यांच्या अनागोंदी कारभारामुळे आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतिक्षेत असुन शासनाच्या लालफितीच्या कारभारात प्रत्यक्ष आरोग्य सेवा अडकून पडली आहे.कुसळंब परीसरातील गोरगरीबांना आरोग्य सेवेपासुन वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे पाटोदा तालुक्यातील दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक प्राथमिक आरोग्य केंद्र तातडीने सुरू करण्यात यावे अन्यथा १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे आणि शेख युनुस च-हाटकर यांना दिले आहे.

कुसळंबचे भुमिपुत्र विद्यमान आरोग्य उपसंचालक डॉ.राधाकृष्ण पवार यांच्या अथक प्रयत्नानंतर तब्बल साडे ६ कोटी रुपये खर्चून कुसळंब येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य ईमारत आणि वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी सर्व सुविधांनी युक्त निवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत. डॉ.राधाकृष्ण पवार हे बीड जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी वाहली येथे मोडकळीस आलेले प्राथमिक आरोग्य केंद्र कुसळंब येथे स्थलांतरित करण्यासाठी प्रयत्न केला.वाहली आणि परीसरातील लोकांनी यास विरोध केला प्रकरण अगदी न्यायालयापर्यंत गेले.त्यानंतर डॉ.पवार यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लाऊन कुसळंब येथे नविन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करून घेतले.आणि केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून त्यांनी त्यासाठी ६ कोटी ३१ लाख रुपयांचा निधी खेचून आणला.तसेच कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम होत असताना जातीने लक्ष घालून दर्जेदार काम होण्यासाठी कायम प्रयत्नशील राहिले. डॉ.पवार यांचे कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात मोलाचे योगदान आहे. कुसळंब आणि दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. शासनातर्फे भरल्या जाणाऱ्या वैद्यकिय अधिकारी आणि आरोग्य सहाय्यकांची दोन पदे भरलेली आहेत.क्लार्क, एएनएम,, सफाई कामगार अशा स्वरुपाचा कर्मचारी वर्ग बाह्य स्त्रोताकडून घ्यावयाचा आहे.हा कर्मचारी वर्ग भरण्यासाठी वरीष्ठ पातळीवरून प्रयत्न सुरू आहेत. लवकरात लवकर दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सुविधा पुरविण्यात येतील.

# तलाठी सज्जा पुनर्रचना करणे गरजेचे - आ.क्षीरसागर

## महसूली कामकाजातील असुसूत्रतेमुळे शेतकऱ्यांना त्रास

बीड । प्रतिनिधी

महसूल प्रशासनाचे कामकाज सोयीचे व्हावे आणि शेतकऱ्यांना तात्काळ सेवा मिळण्याची सुविधा व्हावी याकरिता आवश्यक ठिकाणी तलाठी सज्जा पुनर्रचना करून आवश्यक गावांमध्ये नवीन सज्जा निर्मिती करणे गरजेचे आहे. जेणेकरून शेतकऱ्यांना होणारा त्रास थांबेल. यावर प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

बीड तालुक्यातील लक्ष्मी आई तांडा हे गाव पूर्वी नाळवंडी ग्रामपंचायत अंतर्गत येत होते. परंतु गेल्या दहा वर्षांपासून म्हणजेच दोन ग्रामपंचायत निवडणुका स्वतंत्र स्वरूपात झाल्या आहेत. त्यामुळे या गावाचे स्वतंत्र अभिलेखे तयार करणे गरजेचे आहे. गेल्या ४ वर्षांपासून आ.क्षीरसागर यांनी या विषयाय स्वतः पाठपुरावा केलेला आहे. परंतु आजतागायत या संदर्भात प्रशासनाकडून लक्ष्मी आई तांडा या गावाचे स्वतंत्र अभिलेखे तयार करण्यास दिरंगाई केली आहे. त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांना महसूल विभागाच्या संबंधित कामकाजास अनेक अडचणी येत आहेत. यावर प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करून लक्ष्मी आई तांडा गावाचे स्वतंत्र अभिलेखे तयार करावेत. तसेच बीड तालुक्यातील महाजनवाडी हे गाव लिंबागणेश मंडळातील बोरखेड सज्जामध्ये येते. महसूली कामांच्या अनुषंगाने महाजनवाडी ग्रामस्थांना विविध अडचणी येत असल्याने येथील ग्रामस्थांनी ग्रामपंचायत, ग्रामसभा, सेवा सहकारी सोसायटीचा ठराव तसेच निवेदनाद्वारे महाजनवाडी तलाठी सज्जा नवनिर्मितीसाठी आग्रही भूमिका घेतली आहे. त्यामुळे गावकर्यांच्यावतीने शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. तसेच लक्ष्मीआई तांडा गावाचे स्वतंत्र अभिलेखे तयार करणे आणि महाजनवाडी येथे तलाठी सज्जा नवनिर्मितीसाठी आ.क्षीरसागर यांनी महसूल विभागाचे प्रधान सचिव, विभागीय आयुक्त यांच्याकडेही पत्रव्यवहार केला आहे.

# यशवंत नगर येथे गायत्री महायज्ञ



बीड प्रतिनिधी

गायत्री तीर्थ शांती कुंज हरिद्वार हिंदू धर्म व सनातन संस्कृतीच्या परंपरेनुसार प्रदूषण नष्ट करण्यासाठी तसेच व्यक्तीमध्ये सद्बुद्धी व सत्? प्रेरणा जगविण्यासाठी गायत्री परिवारातर्फे जागोजागी सामुहिक यज्ञ कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. या कार्याचे प्रणेते तपोनिष्ट वेदमूर्ती पंडित श्रीराम शर्मा आचार्य हरिद्वार यांच्या प्रेरणेने दिनांक २४/०७/२०२४ आषाढ वद्य संकष्ट चतुर्थी निमित्त गायत्री महायज्ञ आयोजित केला होता .या गायत्री यज्ञाचे यजमान पद मुकुंद भुतपल्ले हे सहपरिवार हजर होते .सकाळी श्री सिद्धिविनायक गणपती महापूजा यजमान भुतपल्ले व श्री तुकारामजी जोशी यांच्या हस्ते संपन्न झाली. व नंतर गायत्री यज्ञाला सुरुवात झाली या. प्रसंगी मोहन महाराज खरमाटे हे प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाला यजमान भूतपल्ले ,विलास लेंबे ,वाल्मीक चाटे ,रत्नपारखी, पोकळे काकू, भरावे, मेहेत्रे, जाधव,हिंदोळे ,चंपावती पत्रचे महादेव साळुंके तसेच यशवंत नगर मधील रहिवासी मोठ्या संख्येने सामूहिक हवन करण्यासाठी उपस्थित होते.

# जिल्हा शल्यचिकित्सक बडे यांच्याकडून खासगी डॉक्टर व पॅथॉलॉजी लॅबवाल्यांना नोटीस

## ७ दिवसात लेखी अहवाल सादर न केल्यास कार्यवाही करण्याचे बजावले आदेश

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून शहरातील खासगी हॉस्पीटलमध्ये व स्वतंत्र पॅथॉलॉजी लॅबमध्ये प्रत्यक्ष जावून स्टिंग ऑपरेशन केले असता अव्वाच्या-सव्वा दरामध्ये आमच्याकडेच तपासण्या होतात तसेच बाहेरचे रिपोर्ट ग्राह्य धरले जाणार नाहीत आमच्याकडेच तपासण्या करा असा दम दिला जातो. तसेच सर्व पॅथॉलॉजी लॅबचा आढावा घेवून संबंधित लॅब चालक आवश्यक प्रमाणपत्र न घेता लॅब चालवत आहे का व त्या लॅबचालकाची लॅब चालवण्याची पात्रता व तिथे काम करणारे टेक्नीशियन यांचे शिक्षण पुर्ण आहे का? ह्या गोष्टी व तो लॅब चालक कट प्रॅक्टीस करुन नागरिकांची लुट तर करत नाही ना ? याची चौकशी करावी व सर्व नियमांचे पालन होत आहे का याचा आढावा घेण्यात यावा अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली होती अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शहराध्यक्ष करण लोंढे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष ऋषीकेश गिराम पाटील यांच्या वतीने देण्यात आला होता याची दखल घेवून जिल्हा शल्यचिकित्सक बडे यांच्याकडून खासगी डॉक्टर व पॅथॉलॉजी लॅबवाल्यांना नोटीस देण्यात आली आहे.

याबाबत माहिती अशी की, मनसेकडून शहरातील खासगी डॉक्टर व पॅथॉलॉजी लॅब येथे जावून रक्त तपासणी तसेच सोनोग्राफीच्या ट्रिटमेंटची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली होती त्यात त्यांना आढळून आले की, डॉक्टर व पॅथॉलॉजी लॅबवाले मनमानी करतात त्यामुळे त्यांनी जिल्हाशल्यचिकित्सक यांना भेट देवून मागणी केली तसेच मागील दोन दिवसांपासून देखील मनसेकडून आढावा घेणे सुरु आहे त्यात देखील असे आढळून आले कि अजून पर्यंत बर्याच लॅब मध्ये ११वी -१२ वी चे मुलं आणि जयनाचे शिक्षण सुरु आहे असे मुलं कोणत्याही प्रकारच प्रमाणपत्र नसतांना रुग्णांचे रक्त नमुने घेतात ही अत्यंत भयानक वास्तविकता आहे. चक्क नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार फक्त स्वतः च्या फायद्यासाठी डॉक्टरांच्या संगणमतांणे सुरु आहे. तसेच शहरातील पल्स हॉस्पिटल येथील शरद नाईकनवरे या लॅब चालकाने उडवा-उडवीचे उत्तर दिले येथे असलेल्या सुनील वाघमारे यांना कमिशन सुरु आहे का? या लॅब वाल्याकडून असा सवाल उपस्थित केला जातोय आणि अश्याच प्रकारे अनेक प्रकारचे उत्तर वेगवेगळे लॅब वाले देत आहेत ते सर्व पुरावे संबंधित अधिकार्यांकडे मनसेकडून सुपूर्द केले गेले आहेत.तसेच तुळजाई चौक येथील सुनिल शिंदे यांची साईकृपा लॅब असलेल्या ठिकाणी मनसे पदाधिकारी गेले असता तेथे त्यांनी गावचे सरपंच बोलवून घेतात ओळखी काढून चहा पाण्यावर मिटवून घ्या अश्या प्रकारचे मत मांडतात स्वतः च्या चुका दुसर्याला दोषी ठरवून त्यावर आरोप करतात लॅब असोसिएशन चे काही पदाधिकारी मनसे पदाधिकार्यांना उडवा-उडवी चे उत्तर देतात आणि सांगतात की आम्ही सुद्धा राजकारणी आहोत आमचे संबंध आहेत आमची संघटना आहे आता जर का या संघटना अनधिकृत कृत्य करण्यास पाठपुरावा करत असेल तर मग या संघटना मॅनेज होणार्या आहेत का? अश्या कोणत्या संघटना आहेत यांचा लोकउपयोगी कार्यास विरोध करत आहेत. चक्क प्रमापत्र मागितल्यानंतर ज्या महाविद्यालयाचे प्रमाणपत्र आहेत त्या महाविद्यालयचे प्राध्यापक येऊन होत असलेल्या प्रकारास दाबण्याचा प्रकार करत असल्याचा आरोप मनसेकडून करण्यात आला आहे. तसेच १५-२० हजार रुपये घेऊन डीएमएलटी कोर्स चे प्रमाणपत्र मान्यता नसलेल्या संस्थाचे दिले जाते आणि एकही दिवस संस्थेमध्ये क्लास होत नाहीत असे बोगस प्रमाणपत्र देऊन अनधिकृत लॅब चालवण्यास सहाय्य करतात यांच्यावर देखील कार्यवाही व्हावी अशी मागणी मनसेकडून करण्यात आली आहे.

# अण्णा भाऊ साठे राज्यस्तरीय शालेय/आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

## स्पर्धेत सहभागी व्हा - प्रा.प्रदिप रोडे यांचे आवाहन

बीड (प्रतिनिधी):- प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी देवगिरी प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने साहित्यसम्राट डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्त राज्यस्तरीय शालेय/आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दि.११ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० वाजता सदरील स्पर्धा तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे आयोजित करण्यात आली असून या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत युवक, युवती यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन देवगिरी प्रतिष्ठान बीड संस्थापक अध्यक्ष तथा स्पर्धेचे मुख्य संयोजक प्रा.प्रदीप रोडे यांनी केले आहे.



साहित्यसम्राट डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त देवगिरी प्रतिष्ठान बीड दरवर्षी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करते. सदरील राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा यावर्षी १५ व्या वर्षात पदार्पण करत आहे. साहित्यसम्राट डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची कर्तृत्वाची चर्चा व्हावी आणि महापुरुषांच्या आदर्शाची परंपरा भावी पिढीसमोर यावी म्हणून देवगिरी प्रतिष्ठान बीड दरवर्षी राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करते. यावर्षी वरिष्ठ गटासाठी स्पर्धेचे विषय १)अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातुन आलेला मानवतावाद. २) फुले,शाहू,आंबेडकरी चळवळीचे वर्तमान. हे विषय असून कनिष्ठ गटासाठी १) जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मज भीमराव. २) संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णाभाऊ साठे यांचे योगदान. हे विषय आहेत. या स्पर्धेत वरिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक रोख रक्कम सात हजार रुपये,स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक रोख रक्कम पाच हजार रुपये, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र तर तृतीय पारितोषिक तीन हजार रुपये, स्मृतिचिन्ह,प्रमाणपत्र असे आहे. उत्तेजनार्थ तीन स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये रोख रक्कम, स्मृती चिन्ह प्रमाणपत्र तर कनिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक रोख रक्कम पाच हजार रुपये, स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक रोख रक्कम तीन हजार रुपये, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र तर तृतीय पारितोषिक दोन हजार रुपये, स्मृतिचिन्ह,प्रमाणपत्र असे आहे. उत्तेजनार्थ तीन स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये रोख रक्कम, स्मृती चिन्ह प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड, तुलसी इंग्लिश स्कूल बीड येथे नाव नोंदणी करावी आणि युवक, युवती यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन देवगिरी प्रतिष्ठान बीडचे संस्थापक अध्यक्ष तथा स्पर्धेचे मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे यांनी केले आहे.

# शिक्षक पदोन्नतीचा निर्णय तातडीने घ्यावा-राजेंद्र मस्के

## उपोषणकर्त्या शिक्षकांची भेट घेऊन, जि.प. प्रशासनाला दिले पत्र...!



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत शिक्षक पदोन्नतीचा निर्णय दरवर्षी जूनपूर्वी घेतला जातो. परंतु बऱ्याच दिवसापासून शिक्षक पदोन्नतीचा निर्णय प्रलंबित आहे. जून व जुलै अखेर सेवा निवृत्त होणाऱ्या शिक्षक व कर्मचार्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. शाळा सुरु होण्यापूर्वी पदोन्नतीचा निर्णय झाला तर, आवश्यक तेथे शिक्षकांची नेमणूक देऊन विद्यार्थ्यांची गैरसोय टाळता येते. पदोन्नतीचा निर्णय न झाल्यामुळे आज अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची गैरसोय आढळून येते. यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळता येत नाही. शिक्षण व्यवस्थापनाला महत्व देऊन, जिल्हा परिषद प्रशासनाने शिक्षक विभागातील पदोन्नती बाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केली आहे.

केंद्रप्रमुख, शि.वि.अ., ग्रेड मुख्याध्यापक (प्रा), प्राथमिक पदवीधर यांच्या पदोन्नती प्रचलित शासकीय नियमानुसार करण्यात याव्यात, सर्व प्रवर्गाच्या पदोन्नत्या समुपदेशनाद्वारे कराव्यात,प्रचलित नियमानुसार केंद्रप्रमुख सेवाजेष्ठता अंतिम यादी प्रकाशित करण्यात यावी, वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी प्रलंबित प्रस्तावांना ३०/०७/२०२४ पुर्वी मंजुरी मिळावी व वैद्यकिय प्रतिपुर्ती देयके मंजूर करावीत तसेच दरमहा महिना अखेरीस नियमितपणे वैद्यकिय प्रतिपुर्ती मंजूरी समितीच्या बैठका घेण्यात याव्यात या मागण्यासाठी आज पदोन्नती संघर्ष समिती व विविध संघटनेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या कार्यालयासमोर शिक्षकांनी आमरण उपोषण सुरु केले आहे. यादरम्यान भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी उपोषणकर्त्या शिक्षकांची भेट घेऊन त्यांच्याशी सविस्तरपणे चर्चा करून त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. शिक्षकांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करावा असे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड यांना दिले.


## जाहिरनामा

**धारुर येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर साहेब यांचे कोर्टात**

**दिवाणी चौकशी अर्ज क्रं.१७१/२०२४, नि. ९/ड**

**ॲड. डी.एच. मायकर**

**१. मल्हारी पिता नामदेव घोळवे वय २८ वर्षे धंदा-शेती रा. चारदरी ता.धारुर जि. बीड**
**२. मिराबाई भ्र. आश्रुबा नाईकवाडे वय ४५ वर्षे धंदा-घरकाम रा. घागरवाडा ता.धारुर जि. बीड**

विरुध्द : अर्जदार कोणीही नाही , सामनेवाला

ज्या पेक्षा कै. १. कुसाबाई भ्र. नामदेव घोळवे व २. नामदेव पिता बाळकिसन घोळवे यांचे अ.क्रं. १ दिनांक ०१/०५/२०२४ व अ.क्रं.२ दिनांक १५/०३/२०१५ रोजी अ.क्रं.१. स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड येथे व अ.क्रं.२. मौज चारदरी ता.धारुर जि.बीड येथे निधन झालेले आहे त्यांना अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत.

अर्जदाराला शासकिय व निमशासकिय कार्यालयीन कामाकरिता अर्जदार हे मयत कै.१. कुसाबाई भ्र. नामदेव घोळवे व २. नामदेव पिता बाळकिसन घोळवे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने हया मे. कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हयाचे हक्काबददल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत कै. १. कुसाबाई भ्र. नामदेव घोळवे व २. नामदेव पिता बाळकिसन घोळवे यांचे वारसदारांचे सर्टीफिकेट देईल. **आज तारीख २९/०६/२०२४ रोजी आमचे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिला. शेवटची तारीख ३०/०७/२०२४**

आदेशावरून
स्वाक्षरित
शिक्का
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर धारूर**

## जाहीर प्रगटन

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६०५/२०२४**

CNRN0.MHBI0200011082024

**मुक्ताबाई बापुराव जाधव वि. निरंक (मार्फत ॲड. कुलकर्णी जी एस.)**

अर्जदार -१. मुक्ताबाई स. बापुराव जाधव, वय ७० वर्ष, धदा घरकाम, २. प्रकाश पि. बापुराव जाधव, वय ४८ वर्षे, धदा मजुरी ३. विक्रम पि. बापुराव जाधव, वय ४७ वर्ष, धंदा मजुरी ४. आयोध्या भ्र.गोरख केंगार, वय ४२ वर्षे, धंदा-मजुरी सर्व. रा. नरसोबा नगर, बीड ता.जि. बीड

विरुध्द: निरंक मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत बापुराव दादाराव जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत बापुराव दादाराव जाधव यांचा मृत्यु दिनांक ३०/०९/२०२२ रोजी राहते नरसोबा नगर, बीड ता.जि.बीड त्यांचा मृत्यु झाला आहे. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र.२ व ३ हे मयताची मुले आहेत व अर्जदार क्र. ४ हि मयताची मुलगी आहे. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत बापुराव दादाराव जाधव यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कात त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**प्रकरणातील पुढील तारीख २१/०८/२०२४ आज दिनाक २० माहे जुलै २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

स्वाक्षरित
क. लिपीक.
शिक्का
आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

# शिवस्मारकाचा विषय शासनाच्या लेखी फक्त निवडणुकीपुरताच आहे काय? शिवप्रेमींचा सवाल

**बीड । प्रतिनिधी**

अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे जागतिक दर्जाचे स्मारक व्हावे ही मागणी अनेक वर्ष लावून धरल्यानंतर महायुतीच्या पहिल्या कार्यकाळात छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीची स्थापना करण्यात आली. या शिवस्मारक समितीचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना स्वर्गीय विनायकराव मेटे यांनी सुसज्ज कार्यालयाचे निर्मिती देखील केली व तेथूनच त्यांनी या विषयाचे कामकाज केले. ज्यांच्या कर्तुत्वापुढे क्षितिजही ठेंगणे पडले अशा छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक देखील त्या तोलामोलाचे, अद्वितीय असावे असा ध्यास मेटे साहेबांनी घेतला होता. त्यात देशाचे मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांच्या हस्ते जलपूजन करण्यात आल्याने




तमाम शिवप्रेमी मध्ये आनंदाची लहर पसरली होती. परंतु पर्यावरणाच्या मुद्द्यावर माननीय सर्वोच्च न्यायालयाकडून प्रथम तोंडी स्थगिती मिळाल्यामुळे तेव्हापासून ते आजतागायत महाराष्ट्राच्या या स्वप्नातील स्मारकाचे काम पूर्णत्वास गेले नाही.

मुंबईकरांसाठी वरदान ठरणारा अटल सेतू अथवा कोस्टल रोड सारखे प्रकल्प होत असताना पर्यावरणाची हानी होऊ न देता ज्या तत्परतेने शासनाने कार्यवाही केली. ती तत्परता शिवस्मारकाच्या कामांमध्ये शासनाने का दर्शवली नाही? असा प्रश्न निर्माण होतो. महाराष्ट्र शासनाने न्यायालयीन सद्यस्थितीचा आढावा घेऊन सर्व शिवप्रेमी समोर वस्तुस्थिती मांडणे आवश्यक आहे शिवस्मारक समितीच्या कार्यालयाची सध्याची दुरावस्था पाहता प्रत्येक संवेदनशील व्यक्तीस खंत वाटत आहे

महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांनी या कामी जातीने लक्ष देऊन शिवस्मारकाच्या कामास गती द्यावी अशी शिवसंग्रामच्या मावळ्याकडून कळकळीची विनंती करण्यात येत आहे. शिवस्मारकाचे रखडलेले कामकाज २०२२ पासून पुनश्च महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतरही या कामाकडे झालेले दुर्लक्ष यामुळे शासनाच्या हेतूबद्दल शिवप्रेमींच्या मनात भावना तीव्र झालेल्या असल्याने राज्य शासनाने तात्काळ पावले उचलावीत अशी मागणी शिवसंग्राम कडून करण्यात येत आहे.

**अखंड भारताचे स्वप्न साडेतीनशे वर्षांपूर्वी प्रत्यक्ष साकारणारे विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराजांचे जागतिक कीर्तीचे स्मारक अरबी समुद्रात २०१६ साला पासून आज तागायत न झाल्याने एक शिवप्रेमी व या स्मारकासाठी हयातभर पाठपुरावा करणारे दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांच्या विचारांवर चालणाऱ्या असंख्य अनुयायांना पडलेला एक यक्षप्रश्न आहे.***



**डॉ.ज्योती विनायकराव मेटे**
**राष्ट्रीय अध्यक्षा**
**शिवसंग्राम**

# मुख्यमंत्री शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी बीड शिवसैनिकांनी आवळली वज्रमूठ!

**बीड । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे. यादरम्यानच राज्यासह प्रत्येक जिल्ह्यातील उमेदवार आपापल्या मतदार संघात निवडणुकीसाठी कंबर कसत असून मतदारांची बांधणी मोठ्या ताकदीने करत आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप तथा सचिन भैय्या मुळूक यांच्या सूचना मार्गदर्शनाखाली काल दि. २३ जुलै रोजी दुपारी १.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना महिला आघाडी संपर्कप्रमुख सविता किंवांडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शिवसेना महिला आघाडी जिल्हा बैठक संपन्न झाली तर शिवसेना शहरप्रमुख नंदकिशोर पिंगळे यांनी बीड शहराचे पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या दोन्ही बैठकीमध्ये बीड विधानसभा निवडणुकीची रणनीती तयार करण्यात आली असून



शिवसेना महिला आघाडी संपर्कप्रमुख सविता किंवांडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महिला आघाडीची जिल्हा बैठक संपन्न

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष तथा लाडके मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेबांचे हात बळाकट करण्यासाठी शिवसैनिकांनी वज्रमुठ आवळली आहे. मुख्यमंत्री शिंदे साहेब हे अहोरात्र गोरगरीब, शेतकरी तथा सर्वसामान्यांसाठी कष्ट घेत असून राज्यातील जनतेच्या हिताच्या योजना आमलात आणत आहेत. मुख्यमंत्री शिंदे साहेब यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने सामान्य जनतेचे मन जिंकले आहे. यामुळे आगामी काळातही शिंदे सरकार सत्तेत आणण्यासाठी शिवसैनिकांनी निश्चय केला असून सर्व शिवसैनिक कामाला लागले आहेत.

वर्षानुवर्षांपासून बीड मतदार संघाची जागा ही शिवसेनेला सुटत आली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी सलग चाळीस वर्ष बीडवासियांची सेवा केली आहे. जनसेवेचा एक तप त्यांनी पूर्ण केला आहे. सध्याच्या तिथील अवघ्या मतदार संघातून यंदा अनिलदादांना आमदार करूयात अशी प्रतिक्रिया उमठत आहे. अशा परिस्थितीत विधानसभेला अनिलदादा जगताप यांनाच संधी द्यावी, याकरिता बीड जिल्हा महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्या तथा बीड मतदार संघातील

# ओबीसी योद्धा लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांचे पाटोद्यात जंगी स्वागत

**पाटोदा । प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनाचे प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे हे आज पाटोदा शहरात आले असता त्यांचे ओबीसी बांधवांनी जंगी स्वागत केले यावेळी दिलेल्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. प्रा. लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे हे मागील दोन दिवसांपासून जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. ते यातून संवाद साधत ओबीसी बांधवांमध्ये जनजागृती करत आहेत त्यांच्या आगमना निमित्त ठिकठिकाणी रॅली,संवाद सभा आयोजित करण्यात येत आहे. आज बुधवारी दिनांक २४ रोजी प्रा. लक्ष्मण हाके,नवनाथ वाघमारे यांचे पाटोदा शहरात



आगमन झाले. यावेळी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात ओबीसी बांधवांनी त्यांचे जंगी स्वागत केले यावेळी प्रा. हाके यांनी समाज बांधवांशी संवाद साधला यावेळी ओबीसी बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती यावेळी प्राध्यापक हाके बोलताना म्हटले आपले स्थानिक आमदार ओबीसी आरक्षणावर का बोलत नाहीत त्यांना जॉब विचारा यावेळी ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

# जिथे ओबीसी मेळावे तिथे लाखोंच्या संख्येने सहभागी व्हा–प्रा.वैजेनाथ शिंदे

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात ओबीसी राजा मा.ना.छगन भुजबळ साहेब व बहुजन नेते मा.बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिथे मेळावे तिथे सहभागी होण्याचे आवाहन ओबीसी नेते प्रा .वैजेनाथ शिंदे यांनी केले आहे.



कोणताही पक्ष व नेता ओबीसी समाजाचा कार्यक्रम घेत असेल त्या सहभागी होऊन आपली ताकत दाखवून आरक्षण वाचले पाहिजे ही भूमिका आता घेतली पाहिजे माजलगाव विधानसभा मतदारसंघातील धारूर येथे दि.२४/७/२०२४ रोजी दुपारी ४ वाजता व दि.२५/७/२०२४ रोजी माजलगाव येथे दुपारी १२:०० भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे ओबीसी योध्ये मा.प्रा.लक्ष्मण हाके सर व मा.नवनाथ (आबा) वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे . आपल्या अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी व ओबीसी नेत्यांना ताकत देण्यासाठी तरुण ,महिला ,युवती,वयोवृद्ध सर्व घटकांनी सहभागी ◀◀ पान ३ वर

# धारूर तालुक्यातील खिदमतमाश इनामी जमिनीची बेकायदेशीर खरेदी विक्री बंद करा - सय्यद सलिम बापु

**माजलगाव । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील खिदमतमाश इनामी जमीनीची होत असलेली बेकायदेशीर फेरफार व खरेदी - विक्री तात्काळ थांबवण्यात यावी व हे प्रकरण स्वतः हाताळून संबंधीत दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी अन्यथा मंगळवार दिनांक ३० जुलै २०२४ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव समोर बेमुदत अमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे मराठवाडा अध्यक्ष



सय्यद सलीम बापु यांनी दिनांक २२ रोजी उपविगीय अधिकारी माजलगाव यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

धारूर तालुक्यातील दर्गा, मस्जीद, कब्रस्तान, ईदगाह तसेच गायरान जमिनी खिदमतमाश असताना वर्ग - २ च्या जमिनी बेकायदेशीररित्या वर्ग - १ मध्ये रूपांतरित करण्यात आलेले आहेत. याला जबाबदार येथील तहसीलदार , नायब तहसीलदार , मंडळ अधिकारी नजीर कुरेशी, तलाठी मुळे , मंडळ अधिकारी केदार , तसेच नगरपरिषद मुख्याधिकारी धारूर , सहदुय्यम निबंधक धारूर या सर्वांनी भूखंड ◀◀ पान ३ वर

# माजलगाव येथे पूजनीय भंते धम्मशिल जी यांचा वर्षवास कार्यक्रमास सुरूवात



**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील भीमनगर भागात पूजनीय भन्ते धम्मशील यांचा बारावा वर्षवासाचा कार्यक्रमास दिनांक २२ जुलै मंगळवार रोजी सुरुवात करण्यात आली.

सर्वप्रथम पूजनीय भन्तेजी यांचा भीम नगर मधील सर्व महिला मंडळाच्या वतीने भव्य स्वरूपात स्वागत करण्यात येऊन पूजनीय भंते यांच्या हस्ते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला यानंतर भीम नगरचे माजी नगरसेवक राजेश साळवे नवनाथजी ◀◀ पान ३ वर

# मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत नागरी सहकारी बँकामध्ये खाती उघडण्यास सहकार आयुक्त व निबंधक यांची मान्यता

## अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक महिलांना केवळ १०० रुपयात त्यांची खाते उघडून देणार–राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील महिला भगिणीसाठी मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण ही योजना नुकतीच जाहीर केली आहे. या योजने अंतर्गत राज्यातील महिलांना दरमहा १५००/- रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहेत. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी राज्यातील महिलांची सरकारी बँकेत खाते उघडण्यास एकच झुंबड उडत आहे. मात्र सरकारी बँका महिलांचे खाते उघडून घेण्यासाठी उदासीनता दाखवत सदर बँका महिलांना नाहक त्रास देत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यानें शासनाकडून सहकार आयुक्त कार्यालयाने नुकतेच नागरी सहकारी बँकांना देखील महिला भगिनींचे खाते उघडून घेण्यास मान्यता दिली आहे. सहकार आयुक्तांच्या मान्यतेच्या अनुषंगाने अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या मुख्य शाखा (प्रशांत नगर, राज हॉटेलच्या बाजूस) यासह सर्व शाखांमध्ये केवळ १००/- रुपयात महिलांना त्यांची खाती उघडून दिली जाणार आहेत . तेव्हा अंबाजोगाई शहर व परिसरातील त्याचबरोबर अन्य ठिकाणच्या सर्व अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या शाखेत महिला भगिनींनी आपली खाते उघडून घेऊन मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी तथा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी केले आहे.



शासनाने राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्य, आरोग्य त्याचबरोबर पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची "मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजना", लागू केलेली आहे. सदर शासन निर्णयान्वये राज्यातील महिलांसाठी त्यांना दरमहा रु. १५००/- इतकी रक्कम देण्याबाबत शासन योजना जाहिर केलेली आहे. ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यातील शासकीय बँका कमी पडू लागल्या आहेत.पर्यायाने राज्यात विविध नागरी सहकारी बँकाच्या शाखा राज्यभर असल्याने या बँकांमध्ये सदर योजनेचे ◀◀ पान ३ वर

# स्वस्त धान्य दुकानदाराच्या समस्या सोडण्यासाठी जिल्हाधिकारी सोबत बैठक



**जालना । प्रतिनिधी**

२४ जुलै रोजी जिल्हा स्वस्त धान्य दुकानदार, केरोसीन परवाना धारक महासंघ यांच्या रास्तभाव दुकानदारांच्या काही मागण्या व अडीअडचणी संबंधी निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. यावेळी बैठकीत जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी डी.एस. दिवटे यांची उपस्थिती होती.

या बैठकीत रास्तभाव दुकान परवानाधारक यांच्या महत्वाच्या मागण्या व अडीअडचणीवर चर्चा करण्यात आली. राज्यातील रास्तभाव दुकानामध्ये आजच्या महागाई निर्देशानुसार मार्जिनमध्ये योग्य ती वाढ करण्यात यावी. पॉस मशीन संदर्भात येणाऱ्या अडीअडचणी तसेच रास्तभाव दुकानाच्या मार्जिनची रक्कम वेळेवर मिळण्यासाठी सकारात्मक चर्चा झाली.लाभार्थ्यांचे आधार क्रमाकांसह पडताळणी अर्थात ई-केवायसी करणे ही निरंतर प्रक्रिया असायला हवी. एपीएल शेतकरी शिधापत्रिका धारकांना देण्यात येणाऱ्या सबसीडीबाबत चर्चा झाली. तसेच रास्तभाव दुकानदारांच्या अडीअडचणी समजून घेण्यात आल्या.या बैठकीस जिल्हातील रास्तभाव दुकानदार संघटनेची पदाधिकारी व इतर रास्तभाव दुकानदान उपस्थित होते. अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# केशरबाई मुळे यांचे निधन

पाटोदा । प्रतिनिधी

शहरातील मुळे वस्ती भागातील रहिवासी केशरबाई भगवानराव मुळे यांचे दिनांक २४ जुलै रोजी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले मृत्युसमयी त्यांचे वय ८५ वर्ष होते त्या



खूप धार्मिक वृत्तीच्या होत्या, त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे त्या परिसरात प्रसिद्ध होत्या त्यांच्यावर पाटोदा स्मशानभूमी येथे रात्री अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्यात चार मुले, तीन मुली ,सूना, नातवंडे, असा मोठा परिवार आहे पत्रकार छगन मुळे यांच्या त्या आई होत्या. अंत्यसंस्कार प्रसंगी शहरातील प्रतिष्ठित नागरिक डॉक्टर, वकील , शेतकरी, व्यापारी,राजकीय नेते ,नगरसेवक , पत्रकार उपस्थित होते

# चारचाकी वाहन चोरी करणारे तिघांना अटक

**अंबड । प्रतिनिधी**

२३ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान सुखापूरी ता. अंबड येथील नसीर जमीर बागवान यांच्या मालकीची चारचाकी टाटा कंपनिची व्हीस्टा कार क्रमांक चक्र२१त३६०२ ही त्यांनी त्यांच्या घरासमोर लावली होती. सदरची कार त्यांनी रात्री ०८:०० वाजता जाउन पाहीली असता त्यांना ती दिसून आली नाही. त्यामुळे त्यांनी गोंदी पोलीसांना संपर्क केला. गोंदी पोलीसांनी तत्परता दाखवत सदर वाहणाचा हद्दीत शोध घेतला असता त्यांना सदरची गाडी ही करंजळा गावाच्या जवळ जायकवाडी कालव्या जवळ मिळून आली. पोलीसांनी त्यांचा पाठलाग करून सदर गुन्हयातील मुद्दमाल गाडी व गाडी चोरणारे अमोल बन्सी पवार वय २८ वर्षे रा. घुंगडे हदगाव ता. अंबड , अमोल अशोक मेंढकर वय २८ वर्षे रा. घुंगडे हदगाव ता. अंबड, प्रदिप ऊर्फ बाळू भाउसाहेब चिरके वय २६ वर्षे रा. सामानगाव ता. जालना यांना ताब्यात घेउन अटक करण्यात आली आहे. त्यांच्या विरुध्द भारतीय न्याय संहीतेचे कलम ३०३(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या तिघा आरोपींना आज न्यायालयामध्ये हजर केले असता तिघांना १४ दिवसांचा एम सी आर देण्यात आला अशी माहिती गोंदी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर यांनी दिले आहेत.सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधिक्षक, श्री अजयकुमार बंसल , मा. अपर पोलीस अधिक्षक, आयूष नोपाणी , मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड, श्री विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक, आशिष खांडेकर, पोलीस उपनिरीक्षक आय.एम. शेख, पोलीस हेड कॉन्स्टेबल गणेश मुंढे, पोलीस नाईक योगेश दाभाडे पोलीस कॉन्स्टेबल अंकूश पोटे, पोलीस ठाणे गोंदी यांनी केली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक बालासाहेब खवल हे करीत आहेत.

# पैठण पंढरपूर पालखी महामार्ग ३१ डिसेंबर २०२४ पूर्वी पूर्ण करण्याचे माननीय उच्च न्यायालयाचे आदेश

## ॲड.एन.एल जाधव यांच्यामार्फत जनहित याचिका केली होती दाखल

**पाटोदा । प्रतिनिधी**

पैठण पंढरपूर पालखी मार्ग २०१७ रोजी राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित होऊन सदरील कामाच्या निविदा निघून काम सुरू करण्यात आले होते . सदरील ७५२ राष्ट्रीय महामार्ग पैठण मुंगी , बोधेगाव , घोणसपारगाव , उखंडाचकला , बीड , सांगवी शिरूर कासार , राक्षस भुवन , खोल्याचीवाडी , कारेगाव , डोंगरकिन्ही , चुंबळी , पाटोदा पारगावघुमरा , दिघोळला जोडला जाऊन पुढे तो खर्डा मार्गे पंढरपूरकडे जाणार आहे . सदरील मार्गाचे काम सुरू होउन जवळजवळ सात वर्षे झालेली आहेत परंतु अनेक ठिकाणी सदरील रोडचे कामे अपूर्ण स्थितीत पडलेले असून रोड खोदल्यामुळे लोकांना धुळीचा व खड्ड्याचा त्रास होत आहे . अनेक ठिकाणी फुल कम्प्लीट झालेले नाहीत . सदरील पैठण पंढरपूर मार्गामुळे या भागातील लोकांना दळणवळणासाठी अत्यंत जवळचा व चांगला रोड असल्यामुळे व मुख्यतः वारकऱ्यांना पैठण ते पंढरपूर या वारी करण्यासाठी अत्यंत सुखकर मार्ग होणार आहे



परंतु गेल्या वर्षांमध्ये सदरील काम वेगवेगळ्या कारणाने व संबंधित ठेकेदार तसेच अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे पेंडिंग पडलेले आहे या संदर्भामध्ये पाटोदा येथील नागरिक महादेव नाना नागरगोजे तसेच हरिभक्त पारायण रामकृष्ण गणपतराव रंधवे , चक्रपाणी लक्ष्मणराव जाधव यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण , जिल्हाधिकारी बीड , सहाय्यक अभियंता राष्ट्रीय महामार्ग उपविभाग माजलगाव यांना वारंवार निवेदने देऊन सदरील काम लवकरात लवकर करावे अशी विनंती केल्या होत्या तसेच यापूर्वी सदरील रोड संदर्भामध्ये काँ . नागरगोजे यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन व मोर्चे काढण्यात आली होती त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी वरील काम ऑगस्ट २०२३ पर्यंत करण्यात येईल असे आश्वासनही दिले होते परंतु त्यानंतरही सदरील काम पूर्ण करण्यात आलेले नाही व त्यामुळे लोकांचे अतोनात हाल होत आहे या सर्व बाबींचा विचार करून वरील तिघांनी माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठांमध्ये जनहितार्थ याचिका क्रमांक २२/२०२४




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अलर्ट! लोणावळ्यात ढगफुटीसदृश्य पाऊस, १२ वी पर्यंतच्या शाळांना दोन दिवसांची सुट्टी; विनाकारण घराबाहेर पडू नका



**पुणे । प्रतिनिधी**

लोणावळ्यात यावर्षीचा रेकॉर्डब्रेक पाऊस कोसळला आहे. गेल्या ९ तासात १४५ मिलिमीटर पाऊस कोसळला असून पावसाने जोरदार बॅटिंग केली आहे. यावर्षीचा हा रेकॉर्ड ब्रेक पाऊस झाला, असल्याने लोणावळ्यातील नदी नाले ओसंडून वाहू लागले आहेत. लोणावळ्यात पावसाचा जोर काल पासून कायम आहे. उद्या आणि परवा ही अधिकचा पाऊस बरसेल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे. त्यामुळं शहरातील बारावी पर्यंतच्या सर्व शाळांना दोन दिवसांची सुट्टी जाहीर करण्यात आलीये. कोणतीही दुर्घटना घडू नये म्हणून नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अशोक साबळेंनी सुट्टी देण्याचा निर्णय घेतलाय.

लोणावळ्यात अवघ्या नऊ तासांत १४५ मिलीमीटर पाऊस बरसला आहे. आज सकाळी ८ ते सायंकाळी ५ दरम्यानच्या पावसाची ही नोंद आहे. तर काल दिवसभरात २७५ मिलिमीटर पाऊस कोसळला होता. याच पार्श्वभूमीवर शाळांना सुट्टी देण्याचा निर्णय आतापर्यंत लोणावळ्यात २६०१ मिलिमीटर पाऊस झाला आहे. जो गेल्यावर्षीच्या तुलनेत १०१ मिलिमीटरने जास्त आहे. गेल्या वर्षी आजच्या तारखेपर्यंत २५०१ मिलिमीटर पाऊस झाला होता.

मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत

राज्याच्या अनेक भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. अनेक जिल्ह्यामध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाल्याचं चित्र दिसून येत आहे. पुणे(झींपिश ठरळप) जिल्ह्यातील भोर, वेल्हा या भागात १०० मिलिमीटरच्या वरती पावसाची नोंद झाली आहे. तर मावळ आणि भीमाशंकर परिसरात २०० मिलिमीटरच्या वरती पावसाची नोंद झाली आहे. कार्ला, मळवली, सदापुर या भागामध्ये इंद्रायणी नदीच्या पात्रातील पाणी आजूबाजूच्या परिसरामध्ये पसरले आहे. देवले ते मळवली या रस्त्यावर जवळपास दीड ते दोन फूट पाणीच असल्याने नागरिकांना या पाण्यामधून वाट काढत प्रवास करावा लागत आहे.

लोणावळा परिसरात पर्यटकांची गर्दी

मुसळधार पाऊस आणि हिरवा निसर्ग पाहण्यासाठी आणि वर्षाविहारासाठी लोणावळ्यात पर्यटकांचा ओघ वाढला आहे. शहर परिसरात असलेले धबधबे आणि लोणावळा परिसरात पर्यटकांची गर्दी मोठ्या प्रमाणावर वाढू लागली आहे. विक एंडला या भागामध्ये मोठ्या पर्यटक येत असतात. मुसळधार पाऊस असल्याने नागरिकांनी घराबाहेर पडताना विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. त्याचबरोबर कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.



# वडिवळे धरणातून विसर्ग वाढला

**पुणे । प्रतिनिधी**

मावळ तालुक्यात सतत मुसळधार पाऊस सुरू आहे. नाणे मावळातील वडिवळे धरण जवळपास पूर्ण क्षमतेने भरले आहे. त्यामुळे धरणातून दोन दिवसांपासून कुंडली नदी पात्रामध्ये पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. विसर्ग वाढविला असल्याने नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. सोमवारी (दि. २२) दुपारी दीड वाजताच्या सुमारास धरणाच्या सांडव्यावरून एक हजार १२४ क्युसेक विसर्ग सुरू करण्यात आला. पावसाच्या प्रमाणानुसार व येव्यानूसार विसर्ग पुन्हा कमी - जास्त केला जाणार असल्याचे प्रशासनाने सांगितले होते.

धरण क्षेत्रात सततच्या पडत असणाऱ्या पावसामुळे धरण पातळीमध्ये वाढ झाली आहे. तसेच मुसळधार पाऊस सुरू असल्याने वडिवळे धरणाच्या सांडव्यावरून कुंडली नदीपात्रामध्ये पाण्याचा विसर्ग जास्त केला आहे. धरणाच्या सांडव्यावरून कुंडली नदी पात्रामध्ये दोन हजार १७२ क्यूसेक विसर्ग करण्यात आला आहे.त्यामुळे नदीपात्रात कोणीही उतरू नये आणि नदीपात्रात तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत. सर्वांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# मतदार यादीचा सुधारित विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर

## पात्र नागरिकांनी मतदार नोंदणी करण्याचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांचा १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकाच्या आधारावर सुधारित विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. त्यानुसार पात्र नागरिकांनी १६ ऑगस्ट २०२४ पर्यंत मतदार नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले आहे.



डॉ. दिवसे म्हणाले, या कार्यक्रमाअंतर्गत शुक्रवार २ ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या प्रारुप यादीच्या अनुषंगाने मतदार यादीवरील दावे व हरकती शुक्रवार २ ऑगस्ट ते शुक्रवार १६ ऑगस्ट या कालावधीत स्विकारण्यात येणार आहे. प्राप्त हरकती आणि आक्षेपांवर २६ ऑगस्टपर्यंत कार्यवाही करण्यात येईल. त्यांनतर मंगळवार २७ ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.मतदार यादीचा विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाअंतर्गत नवीन मतदारांची नाव नोंदणी करणे, मयत मतदारांचे, स्थलांतरीत मतदाराचे नाव वगळणे, मतदार ओळखपत्रातील त्रुटी दूर करणे, भारत निवडणुक आयोगाच्या मानकानुसार छायाचित्र प्राप्त करून मतदारयादीत सुधारणा करणे, मतदार यादी तयार करणे आदी कामे प्रामुख्याने करण्यात येणार आहेत. प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर मतदारांनी नोंदणी केलेले नाव, पत्ता, वय व इतर तपशील योग्य असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच त्यात दुरुस्तीची आवश्यकता असल्यास या कालावधीत संबंधित तपशील तपासून घ्यावे, काही बदल असल्यास त्यामध्ये दुरुस्ती करुन घ्यावी. आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्यावेळी सर्व मतदाराना मतदानाचा हक्क बजावता यावा, याकरीता जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे. जिल्ह्यात १८ ते १९ वयोगटातील युवकांचा मतदार प्रक्रियेतील सहभाग वाढविण्यासाठी महाविद्यालयात मतदार नोंदणीसाठी विशेष अभियान राबविण्यात येत आहे, जिल्ह्यातील पात्र नागरिकांनी या कार्यक्रमात उत्सूर्फतपणे सहभागी होऊन त्यांची नावे मतदार यादीत नोंदणी करावीत, असे आवाहन डॉ. दिवसे यांनी केले आहे.

# विद्रोह विवेकी असावा - प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस

**पुणे । प्रतिनिधी**

पाली - मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या जन्मशताब्दी आणि ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त बाबा भारती प्रतिष्ठान, पिंपरी - पुणे आयोजित बाबा भारती जीवनगौरव, समाजभूषण, धम्मभूषण आणि साहित्य पुरस्कार प्रदान सोहळ्यात प्रा. डॉ. सबनीस बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषद - पुणे प्रमुख कार्यवाह सुनीताराजे पवार अध्यक्षस्थानी होत्या; तर नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीचे अध्यक्ष सुदाम भोरे आणि बाबा भारती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांची प्रमुख उपस्थितीती होती. याप्रसंगी बार्टी पुणेचे महासंचालक सुनील वारे यांना बाबा भारती जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले; तसेच संभाजी खैरमोडे (बाबा भारती समाजभूषण), भगवान जाधव (बाबा भारती धम्मभूषण) तसेच प्रा. प्रभाकर दाभाडे, सुप्रिया सोळांकुरे आणि मानसी चिटणीस यांना बाबा भारती साहित्य पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.



प्रा. डॉ. सबनीस पुढे म्हणाले की, समाजात बहुजन आणि अभिजन हे दोन्हीही विचार आणि प्रवृत्ती नांदत असताना त्यांच्यात जातीयतेचे विष पेरून त्यांची विभागणी करणे योग्य नाही. याउलट त्यांच्यात समन्वय साधणे जास्त श्रेयस्कर आहे. दलित समाजातील जगन्नाथ कांबळे हे 'बाबा भारती' म्हणून जाती अंताचे काम करीत होते ही अभिमानास्पद बाब होती. अभिजन आणि बहुजन यांच्यात समन्वय घडवून आणण्याचे कार्य त्यांच्या नावाचे प्रतिष्ठान करीत आहे, ही प्रशंसनीय गोष्ट आहे. सुदाम भोरे यांनी, साहित्याने माझ्या जीवनात खूप मोठे परिवर्तन घडवून आणले. साहित्यिकांनी शेतकऱ्यांना बळ द्यावे! अशी अपेक्षा व्यक्त केली. सुनीताराजे पवार यांनी अध्यक्षीय मनोगतातून, लौकिकार्थाने आता हयात नसलेल्या बाबा भारती यांचे विचार आणि कार्य ३४ वर्षांनंतरही अस्तित्वात आहे, हे समाजासाठी दिलासादायक आहे. संस्कृती ही एका पिढीकडून दुसर्या पिढीकडे संक्रमित होत असते. अंतर्मुख होऊन आपल्यातील माणसाचा शोध घेतला पाहिजे! असे विचार मांडले. सत्काराला उत्तर देताना सुनील वारे यांनी, देशाच्या विविध भागात महापुरुषांच्या विचारांचा मागोवा घेण्याची संधी मला मिळाली. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना पाली भाषेचे महत्त्व जाणवले आणि त्यावेळी पहिल्यांदाच बाबा भारती यांच्या शब्दकोशाची मदत झाली! अशी भावना व्यक्त केली. पुरुषोत्तम सदाफुले यांनी पुरस्कारार्थींशी सुसंवाद साधून त्यांच्या भावना जाणून घेतल्या. वृक्षपूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. रवींद्र भारती, निमिष भारती, प्रकाश कांबळे, प्रशांत दीक्षित, अरुण गराडे, प्रभाकर वाघोले, जयवंत भोसले यांनी संयोजनात सहकार्य केले. प्रा. दिगंबर ढोकले यांनी सूत्रसंचालन केले. राजेंद्र वाघ यांनी आभार मानले.

# साकोरीतून कांद्याच्या १०० गोण्यांची चोरी

जुन्नर, साकोरी (माळवाडी,ता. जुन्नर) येथील विक्रम अशोक साळवे यांच्या कांदा चाळीमधून रविवारी (ता.२२) रात्री सुमारे साडेपाच टन कांदा चोरी गेला आहे. याबाबत साळवे यांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध आळेफाटा पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार साळवे यांनी डिसेंबर २०२३ मध्ये तीन एकर क्षेत्रामध्ये कांद्याची लागवड केली होती. कांद्याला बाजारभाव नसल्यामुळे त्यांनी कांदा साठवून ठेवण्याचे ठरवले. त्यासाठी मनोहर पानसरे मु. साकोरी (पानसरे मळा) यांची कांदा चाळी भाड्याने घेऊन त्यामध्ये सुमारे ५५० गोणी कांदा साठवून ठेवला होता. रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्याने दोन ते तीन ठिकाणी ही कांदा चाळ फोडून सुमारे १०० गोणी कांदा चोरी केला. यामध्ये १ लाख १० हजार रुपयांचं नुकसान झाले असल्याची फिर्याद विक्रम अशोक साळवे यांनी आळेफाटा पोलिसांनी दिली.जुन्नर तालुक्यामध्ये भुरट्या चोरांचे प्रमाण वाढले असून, कांद्याचे रोप चोरणे, कांदा चोरणे, सोयाबीन, चोरणे, टोमॅटो चोरणे आदी प्रकार वाढल्यामुळे शेतकरी हवालदार झाला आहे. जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागात पुरेसा पाऊस नसल्याने आधीच शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, अशा चोऱ्यामुळे मोठा भुर्दंड शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे.

## मद्यधुंद बस चालकाकडून पुण्यातील कोथरूड भागात अपघात

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील कोथरूड भागात अपघात झाला आहे. एक खाजगी कंपनीच्या बस चालकानेने ३ ते ४ वाहनांना दिली धडक आहे.बस चालक हा दारू पिऊन गाडी चालवत होता त्यामुळे हा अपघात घडला आहे. या अपघातात २ जणं जखमी झाले आहेत, जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केलं आहे. धडक बसलेल्या वाहनांचे मोठे नुकसान झाले असून बस चालकला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# वीर फाटा बनला धोकादायक; अपघातांची मालिका सुरूच



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे-पंढरपूर महामार्गावरील सासवड (ता. पुरंदर) येथील वीर फाटा हा वाहनचालकांसाठी धोकादायक बनलेला आहे. या ठिकाणी अपघातांची मालिका सुरूच आहे. मात्र, तरीदेखील या ब्लॅक स्पॉट अर्थात मृत्यूच्या सापळ्याकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे.

वीर फाटा येथे अत्यंत धोकादायक वळण आहे. रस्त्यावर मोठे खड्डे पडलेले आहेत, काही ठिकाणी रस्ता खचून पाणी साचले आहे. या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. या ठिकाणी रोज छोटे-मोठे अपघात घडत आहेत. हा प्रवास जीवघेणा झाला आहे.

ताथेवाडीच्या वाडी-वस्तीवरील शेतकर्यांची शेती पालखी मार्गाच्या पलीकडच्या बाजूला आहे. रेडिएटर कंपनीसमोरील रस्ता ओलांडताना शेतकर्यांना जीव मुठीत धरून जावे लागते. रासकरमळा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेसमोर एकेरी रस्ता व पुढे धोकादायक पूल असल्याने या भागात वाहतूक कोंडी व अपघात नित्याचे झाले आहेत.

# पीएमआरडीए क्षेत्रातील अनधिकृत जाहिरात फलक ३१ जुलैपर्यंत हटविण्याचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व अनधिकृत व धोकादायक जाहिरात फलक, आकाशचिन्ह, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स त्वरीत जाहिरात फलक मालक, जागा मालक, विकासक, जाहिरातदार संस्थांना ३१ जुलैपर्यंत हटविण्याचे आवाहन पीएमआरडीए अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभागाचे सह आयुक्त अनिल दौंडे यांनी केले आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्राच्या हद्दीतील सर्व आकाशचिन्ह, बोर्ड, बॅनर, फ्लेक्सधारक यांनी आतापर्यंत ८५७ प्रस्ताव दाखल केले आहेत. उर्वरित जाहिरात फलकधारकांनी परवानगीकरिता प्रस्ताव दाखल करावेत. विकास परवानगी विभागाने दाखल केलेल्या प्रस्तावापैकी ४१० बोर्ड, बॅनर, फ्लेक्सधारक यांना त्रुटी पुर्ण करण्याकरिता कळविले असून त्रुटी दिलेल्या मुदतीत पूर्ण कराव्यात अन्यथा प्राधिकरणामार्फत निष्कासन करवाई करण्यात येईल. प्राधिकरण कार्यक्षेत्रातील अनधिकृत, धोकादायक आकाशचिन्ह, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स ३१ जुलैपर्यत स्वतःहून काढून घ्यावेत अन्यथा ते निष्कासित करण्यात येतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असेही दौंडे म्हणाले.

# मनोज जरांगे अन् श्याम मानव एकच अजेंडा चालवतात, भाजपला पराभूत करा; चित्रा वाघ संतापल्या

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा तापला असून उपोषणकर्ते मनोज जरांगे यांनी आज आपलं उपोषण स्थगित केलं आहे. आता, विधानसभा निवडणुकांची तयारी करणार असून राज्यात किती जागा लढवायच्या हे १३ ऑगस्ट रोजी जाहीर करणार असल्याचं मनोज जरांगे यांनी म्हटलं. दुसरीकडे अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या श्याम मानव यांनी नाव न घेता भाजप नेत्यांवर गंभीर आरोप केले आहेत. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचा संदर्भ देत मानव यांनी भाजप नेत्यांना लक्ष्य केलं. त्यावरुन, आता भाजप नेतेही आरोपांना प्रत्युत्तर देत आहेत. भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांनी व्हिडिओच्या माध्यमातून श्याम मानव यांच्या आरोपांचे खंडन केले आहे. तसेच, मनोज जरांगे आणि श्याम मानव एकच अजेंडा चालवत असल्याचंही त्यांनी म्हटलं.

मनोज जरांगे यांनी आता जनतेत जाऊन आपण पुढील भूमिका ठरवणार असल्याचे म्हटले आहे. तर, श्याम मानव यांच्या आरोपावरुन माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनीही भाजपला लक्ष्य केलंय. आता, याच घटनांचा संदर्भ देत चित्रा वाघ यांनी आरोपांवर पलटवार केला आहे. मनोज जरांगे जनतेत जाणार आणि श्याम मानव देखील जनतेत जाणार आहेत. म्हणजे, दोघांचा एकच अजेंडा असणार, भाजपला पराभूत करा. मोठ्या साहेबांची इकोसिस्टीम आता सतर्क झालेली आहे, अशा शब्दात चित्रा वाघ यांनी श्याम मानव यांनी केलेल्या आरोपावरुन पलटवार केला आहे.



लोकशाहीत प्रत्येकाचे स्वागत आहे, फेक नरेटीवची एक मोठी फॅक्टरी लोकसभेत तयार झालेली होती. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी आधीच म्हटलंय, जेव्हा मी अनिल देशमुख यांच्या बद्दल बोलेन तेव्हा त्यांना तोंड दाखवायला देखील जागा राहणार नाही. अनिल देशमुख यांच्याकडे पुरावा मागितला मग ते उठून का गेले, असा सवाल चित्रा वाघ यांनी विचारला. तसेच, विशेष सरकारी वकील प्रवीण चव्हाण यांची कथा विधानसभेत मांडली. हा सरकारी वकील शरद पवार यांचा ऑपरेटिव्ह एजंट असणारा आहे, याचा व्हिडिओ देखील समोर आला होता. तर, अनिल गोटे यांचेही संभाषण समोर आलं होतं. दरम्यान, अनिल देशमुख यांनी १०० कोटी नाहीतर २५० कोटी पेक्षा अधिक पैसे वसुलीतून कमावले असल्याचा गंभीर आरोप चित्रा वाघ यांनी केला आहे.

काय म्हणाले होते श्याम मानव

अनिल देशमुख गृहमंत्री असताना काही लोकांकडून सांगण्यात आलं होतं की, तुम्हाला ईडीच्या प्रकरणातून स्वतःची सोडवणूक करून घ्यायची असेल, तर तुम्ही १०० कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणात उद्धव ठाकरे यांचं नाव घ्यावं. आदित्य ठाकरे यांचं नाव दिशा सालियन बलात्कार आणि हत्या प्रकरणात घ्यावं, अनिल परब यांचंही नाव त्यांच्याशी संबंधित बेकायदेशीर व्यवहारांच्या प्रकरणात घ्यावं. मात्र, अनिल देशमुख यांनी तसं केलं नाही., असं श्याम मानव यांनी म्हटलं होतं. त्यानंतर, अनिल देशमुख यांनीही याप्रकरणी भाष्य करताना भाजप नेत्यांवर गंभीर आरोप केले आहेत.

# 'दुष्काळी भागातील तलावात अधिकचे पाणी सोडा'

सुपे । प्रतिनिधी

खडकवासला धरणातून कालव्याद्वारे अधिकचे वाहून जाणारे पाणी जनाई व शिरसाई उपसा जल सिंचन योजनेद्वारे दुष्काळी भागातील तलावात सोडण्याची शेतकरी संघर्ष कृती समितीची मागणी आहे. याबाबत पुणे पाटबंधारे मंडळाच्या अधीक्षक अभियंत्यांसह संबंधित कार्यालयाकडे शेतकरी संघर्ष कृती समितीने लेखी निवेदनाद्वारे मागणी केल्याची माहिती पोपटराव खैरे यांनी दिली. जनाई-शिरसाई योजनेद्वारे आता पाणी मिळाले तर खरिपातील पिकांना जीवदान मिळणार आहे. त्यामुळे या उपसा सिंचन योजना सरकारने तातडीने सुरू करण्याची त्यांची मागणी आहे. बारामती, दौंड व पुरंदर तालुक्यांच्या योजनेच्या लाभधारक गावांच्या परिसरात झालेल्या पावसावर शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या आहेत. परंतु, पुरेसा पाऊस नसल्याने अनेक तलावात पाणीसाठा झाला नाही. ओव्हरफ्लोच्या पाण्याने योजनेद्वारे दुष्काळी भागातील तलाव भरण्याची मागणी करण्यात आली आहे.